. ग्रं. सं. ठाणें




# गीतेत काय आहे ?

REFBK-0021643

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

22 MAY 1977

10 JUL 1977

21 SEP 1981

[ क्रु. मा. प. ]

29643
30/3/55
निबंध

# ‘ गीतेत काय आहे ? ’

REFBK-0021643

: लेखक :
ना. वा. गोखले ( दर्यापूर )

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | अर्घ्यप्रदान | ५ |
| २. | अर्जुनविषादयोग | ८ |
| ३. | सांख्ययोग | १० |
| ४. | कर्मयोग | १४ |
| ५. | ज्ञानकर्मसंन्यासयोग | १७ |
| ६. | संन्यासयोग | १९ |
| ७. | ध्यानयोग | २१ |
| ८. | ज्ञानविज्ञानयोग | २३ |
| ९. | ब्रह्माक्षरनिर्देश | २४ |
| १०. | राजविद्या–राजगुह्ययोग | २७ |
| ११. | विभूतियोग | २९ |
| १२. | विश्वरूपदर्शन | ३० |
| १३. | भक्तियोग | ३२ |
| १४. | क्षेत्रक्षेत्रज्ञयोग | ३४ |
| १५. | गुणत्रयविभाग | ३५ |
| १६. | पुरुषोत्तमयोग | ३७ |
| १७. | दैवासुरसंपद्विभागयोग | ३८ |
| १८. | श्रद्धात्रयविभागयोग | ४० |
| १९. | मोक्षसंन्यास | ४१ |
| २०. | अर्जुनाने विचारलेले प्रश्न | ४६ |
| २१. | भगवान श्रीकृष्णाचे आत्मचरित्र | ४७ |

# अर्घ्य - प्रदान

गीतेवर लिहिण्याचा मला काय अधिकार ? ज्ञानी या नात्याने, मुळीच नाही; अभ्यासक म्हणून असलेला माझा अधिकार कोणीच हिरावून घेऊ शकत नाही. गीता मला कितपत समजली, हे मी येथे सांगून पाहत आहे. टिटवी समुद्र उपसत आहे.

अभ्यास व्हावा या दृष्टीनेच समश्लोकी हिंदी अनुवादाचा प्रयास केल्यानंतर-ही, गीतेतील विचारसूत्र नीटसे ध्यानी आले आहे, असे वाटेना. अध्यायांची संगती, विचारातून विचारांची उपज, यांवर पकड यावी म्हणून हाती पेन्सिल घेऊन, खुणा करीत वाचू लागलो, टिपणे काढीत वाचनाच्या आवृत्त्या केल्या.

वाचण्यापूर्वी व वाचतानाही मनाची पाटी स्वच्छ कोरी नव्हती; तीवर पुसट काही प्रश्न होते. गीता ग्रंथ ज्ञानयोगपर आहे, कर्मयोगपर आहे की भक्तियोग-पर ? मुसलमानांचा जसा कुराण किंवा ख्रिस्ती लोकांचा जसा बायबल हा धर्म-ग्रंथ, तसाच गीता हा हिंदूंचा धर्मग्रंथ आहे काय ? गीताग्रंथ हाती घेऊन हसत-मुखाने भारतीय देशभक्त स्वातंत्र्यासाठी फासावर चढले हे वाचलेले असल्या-मुळे ह्या ग्रंथाभोवती जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे एक दिव्य तेजोवलय निर्माण झालेले होतेच. आणि भरीला, माझ्या पितामहांच्या नित्य गीताचिंतनामुळे गीते-बद्दल एक प्रकारची आप्तताही माझ्या मनात होतीच.

भाष्य किंवा टीका मदतीला घेतल्याखेरीज गीता समजणे सामान्याला सोपे नाही. भाष्यांची मदत घेताना हे लक्षात आले की, 'गीता काय सांगते' हे सांगण्यापेक्षा 'गीतेच्या आधारे मी काय समजू व सांगू शकतो' हेच भाष्यकार सांगतो, भाष्यकाराने स्वमतप्रतिपादन करण्यात अर्थातच गैर असे काहीही नाही. भगवत्पूज्यपाद श्रीमत् आद्य शंकराचार्य, श्री ज्ञानेश्वर महाराज आणि ऋषितुल्य पूज्य विनोबा ह्या भाष्यकारांना जवळ घेऊन मी गीता वाचू लागलो. भाष्यकार म्हणून हे तिघेही अप्रतिम आहेत, हे काय मी सांगायला पाहिजे ?

भगवद्गीतेत, ईश्वर, सृष्टी, ज्ञान, कर्म, भक्ती इत्यादी अनेक विषय आहेत. ईश्वर कसा आहे याबद्दलचे वर्णन पुष्कळच शब्दगम्य आहे. पण, ईश्वराने सृष्टी

का व कशी निर्माण केली याबद्दलचे विवेचन शब्दगम्यतेच्या दृष्टीनेही घोटाळ्यात पाडणारे आहे. गद्य प्रबंधात अपेक्षित अशी सुसूत्रता किंवा संगती गीतेत कशी सापडणार ? मात्र अथपासून इतिपर्यंत ‘ ईश्वर व ईश्वरप्राप्ती ’ किंवा ‘ परमात्मा व मोक्ष ’ हा एकमेव विषय असल्यामुळे विषयांतर नाही. भगवद्‌गीता हे उपनिषद असून, यात ब्रह्मविद्यांतर्गत योगशास्त्र सांगितले आहे, असे प्रत्येक अध्यायाच्या शेवटी सांगितलेलेच आहे व ह्या एका विषयाला धरून ‘ अर्जुनविषाद योग ’ ते ‘ मोक्षसंन्यासयोग ’ अशी अनुक्रमणिका आहे ती देखील बोलकीच आहे.

वाचनात येणारी गीतेतील उद्धृते पाहून माझा असा ग्रह झाला होता की गीता मार्क्सच्या कॅपिटल ग्रंथासारखा ऐहिक उन्नतिपर असा ग्रंथ असावा. लो. टिळकांनी स्वराज्यसंपादनाच्या कामी गीतेचा आधार घेतलेला ऐकून तो ग्रह पक्का झाला होता. ओठावर ‘ अध्यात्म ’ पण पोटांत ‘ अधिभूत ’ असणारे आणि म्हणून अध्यात्मविषयक ग्रंथांची अपकीर्ती पसरविणारे महाभाग पुष्कळ असतात. ‘ लोकमान्य ’ त्यांपैकी नव्हते. किंबहुना त्यांचे तसेच महात्मा गांधींचे ‘ स्वराज्य ’ व ‘ स्वातंत्र्य ’ ह्या गोष्टी आध्यात्मिक स्वातंत्र्यांतर्गतच होत्या, हे विदितच आहे.

गीतेतील ‘ चातुर्वर्ण्य ’ हा विषय कमालीचा तर्कदुष्ट व समाजशास्त्रविरोधी आहे, असे माझे एकेकाळी मत झाले होते. पण वाटली तेवढी तर्कदुष्टता किंवा अशास्त्रीयता मला आज वाटत नाही. आज मी एवढेच म्हणेन की पुनर्जन्म न मानणाराला गीताप्रणीत ‘ गुणकर्मविभागशः चातुर्वर्ण्य ’ मर्मग्राही वाटत नाही. गीतेने पुनर्जन्म मानलेला आहे. त्यामुळे ‘ स्वभाव ’ व ‘ स्वभाव-ज कर्म ’ आणि म्हणून स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः’ हे सारे सयुक्तिक ठरते. परंतु मग. ‘ सर्व धर्मान् परित्यज्य ’ हे सांगण्यात रहस्य उरत नाही; नाही का ?

गीतेचा अभ्यास करून झाला आहे, असे मी तरी म्हणू शकत नाही. पण ईषत् अभ्यासाने, गीतेविषयी मला जे काय वाटत आहे, ते असे–

गीताशास्त्र हे श्रद्धेवरच आधारलेले आहे. श्रद्धा या पायावरच ज्ञानयोग व कर्मयोग सांगितला आहे. पण गीतेचा भर भक्तियोगावरच आहे. गीता, केवळ हिंदूंचा व धर्मग्रंथ नसून, तो जगाला मार्गदर्शन करणारा तत्त्वज्ञानाचा व जगाने आपला म्हणावा असा ग्रंथ आहे. आध्यात्मिक ग्रंथ असला तरी त्यात अभ्युदय व निःश्रेयस एकसंध आहेत. आणि गीतेबद्दलची खरी आपुलकी अभ्यासिकेतील अभ्यासाने अथवा देवघरातील पारायणांनी येणारी नसून, गीतेची शिकवण

आचरणात आणण्याच्या प्रयत्नानेच येणार आहे. आचार्य विनोबा हे त्याचे जिवंत उदाहरण आहेत.

जग हे 'असत्य व अप्रतिष्ठ' आहे असे म्हणणारांना गीता, 'आसुरी संपत् इच्छिणारे' म्हणून मोकळी होते. पण आजच्या काही विज्ञानमहर्षींकडे पाहून, गीतेच्या ह्या अभिप्रायाबाबत मन साशंक होते.

'सर्व-धर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज । अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः' हा श्लोक मला गीता-सार वाटतो.

उपनिषदे ह्या धेनू, गोपालकृष्ण धार काढणारा, पार्थ हे वत्स, सुधी म्हणजे देवभीरू मनुष्य हा दुग्ध प्राशन करणारा आणि त्याच्यासाठी गीता हे अमृतोपम दूध ! ह्या सुप्रसिद्ध व सर्वमान्य रूपकाबरोबरच पुढील वर्णनही गीता समजण्यास उपयुक्त ठरेल : गीता हे शास्त्र आहे. वेदव्यास हे त्याचे ऋषी. परमात्मा ही गीतेची देवता, श्रद्धा ही शक्ती व इंद्रियदमन हे कीलक होय.

वेळात वेळ काढून ह्या माझ्या टिपणांचे वाचन करून, मला केलेल्या सूचनांबद्दल, प्रबोधन विद्यालयाचे श्री गंगाधरपंत जोशी यांचा मी ऋणी आहे. ही टिपणे छापून वाचकांपर्यंत पोचविण्याचे श्रेय माझा धाकटा भाऊ गंगाधर याचे आहे. त्याचे सक्रिय प्रोत्साहन नसते तर हा निबंध अप्रकाशितच राहिला असता. कोणी गृहस्थाश्रमी काही वाचन, मनन, लेखन करतो म्हणजे त्याला त्यासाठी निवांत वेळ मिळतो, हे उघडच आहे, आणि त्याचे श्रेय नेहमी गृहिणीलाच द्यावे लागते. पत्नीचे 'आभार मानण्याची' प्रथा भारतीय नसली तरी योग्य ते श्रेय सौ. शांताबाईंना देणे अभारतीय ठरू नये.

'उरलेल्या आयुष्यात माझे चित्त गीतेसारख्या ग्रंथात अधिकाधिक रमू दे' अशी नम्र प्रार्थना करून 'इदं न मम' पूर्वक हा प्रस्तावना-अर्घ्य येथेच सोडतो.

दर्यापूर ( विदर्भ )<br>
ख्रिस्तजयंती, १९७७

विनीत<br>
**नारायण वासुदेव गोखले**

# अध्याय १ ला

## अर्जुनाने धनुष्य उचलले

" धर्मक्षेत्र असलेल्या कुरुक्षेत्रात युद्धाला ठाकलेल्या माझ्या मुलांनी ( म्हणजे कौरवांनी ) आणि पंडूच्या मुलांनी ( म्हणजे पांडवांनी ) काय केले, ते मला सांग " असे धृतराष्ट्र संजयाला म्हणाला.

दोन्ही बाजूंकडील प्रसिद्ध योद्ध्यांची नावे सांगून संजयाने युद्धपूर्व शंख-भेऱ्या-नगारे इत्यादिकांचे नाद वर्णन करून सांगितले. ज्या नादाने आकाश व पृथ्वी दुमदुमून गेली त्याच नादाने कौरवांची हृदये विदीर्ण झाली. पांडवांची हृदये विदीर्ण झाल्याचे वर्णन नाही. कौरवांनी शस्त्र-प्रहाराला सुरुवात करताच अर्जुनानेही धनुष्य उचलले.

## चुकलेला कौरव पक्ष

आणि अर्जुन श्रीकृष्णाला म्हणाला, " माझा रथ दोन्ही सैन्यांच्यामध्ये उभा कर. युद्ध करण्याची खुमखुमी कोणाकोणाला आहे, ते मला पाहू दे. आणि त्यांपैकी कोणाकोणाशी मला लढावे लागणार आहे, तेही मला बघू दे. "

येथेच अर्जुनाने ' दुर्बुद्धी ' हे विशेषण कौरवांना लावले आहे. कौरव दुर्बुद्धी आहेत, अशा कौरवांचे हित व्हावे अशी इच्छा जे करतात तेही अर्थातच चुकले आहेत, असाच अर्जुनाचा अभिप्राय दिसतो. आणि विशेषतः ' वाटाघाटी ' बंद करून, ' रणी ' ठाकून कौरवांचे हित साधू पाहणारे आहेत तरी कोण, हे पाहण्यासाठी अर्जुन उत्सुक झाला. कौरव पक्ष चुकलेला आहे हे अर्जुनाचे मत स्पष्ट आहे.

## अर्जुनाला विषाद का झाला ?

श्रीकृष्णाने अर्जुनाचा रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी आणून उभा केला, असे सांगून संजयाने अर्जुनाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे–दुर्बुद्धी असलेल्या कौरवांचे हित साधू पाहणारे माझे आजे, पणजे, आचार्य, मामा, भाऊ, पुत्र, पौत्र आणि

मित्रच आहेत, वास्तविक शत्रू कोणीच नाहीत आणि तरीही त्यांच्याशीच युद्ध करावे लागणार आहे हे पाहून अर्जुन 'कृपाकुल' आणि 'विषादयुक्त' झाला.

## अर्जुनविषादाची वैचारिक पार्श्वभूमी

पहिल्या अध्यायातील ३१ ते ४६ या श्लोकांत अर्जुनाच्या विषादामागील त्याचे स्वतःचे विचार मांडले आहेत ते असे—

'राज्यसुखाच्या लोभाने स्वजनांना ठार करणे हे पाप आहे', हा त्या विचारांचा सारांश होय.

'कुलक्षय, धर्मक्षय, स्त्रियांचे दुष्टत्व, वर्णसंकर आणि अखेर सर्वांना नरकवास' ही एक युद्धोत्तर परंपराही अर्जुनाने बोलून दाखविली आहे.

पण, धनुष्यबाण टाकून देऊन, प्रतिकार न करता अर्जुन रथात नुसता बसून राहिला, याचे मुख्य कारण म्हणजे, 'अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम्' म्हणजे 'केवढे थोरले पाप करायला तयार झालो आहोत आपण!' अशी पापभीरुता.

## अर्जुनाची धर्मसंमूढता

अर्जुनाच्या कृपाकुलतेमागे व विषादामागे हा जो पापासंबंधीचा विचार आहे तो योग्यच नाही का? पाप म्हणजे काय, ते जाणून अर्जुन ते पाप टाळू पाहत होता, हे योग्यच होते. त्याला 'धर्मसंमूढ' म्हणजे 'कर्तव्य व अकर्तव्य याबाबतीत निर्बुद्ध बनलेला' कसे म्हणावे ?

पण, गीताप्रवचनात विनोबा सांगतात, 'अर्जुनाचे बोलणे आंतरिक नव्हते. ते आसक्तिजन्य होते. आसक्तिजन्य मोहाने अर्जुनाची कर्तव्यनिष्ठा ग्रासली.'

याचा अर्थ असा की, नातेवाईक आणि मित्र यांच्या ऐवजी अपरिचित असे लोक शत्रुसैन्यात दिसले असते तर 'यांना कसे मारू?' हा प्रश्न त्याला पडला नसता. असो.

पहिल्या अध्यायाला भगवद्गीतेचा उपोद्घात मानल्यास, 'धर्मसंमूढता घालविण्यासाठीच गीता सांगितली गेली' असे म्हणता येईल.

## परिशिष्ट

अर्जुनाची कर्तव्यनिष्ठा आसक्तिजन्य मोहाने ग्रासली आणि तो विषण्ण झाला

* * *

# अध्याय २ रा

## सांख्ययोग की योग ?

ह्या अध्यायाचे नाव आहे 'सांख्ययोग;' पण ह्यातील मजकूर पाहता 'योग' एवढेच नाव सार्थ ठरावे. गीतेतील तत्त्वज्ञान मुख्यतः दुसऱ्या व तिसऱ्या अध्यायातच आले आहे. शंकराचार्यांचा आवडता सांख्ययोग तर येथे आहेच पण लोकमान्य टिळकांचा आवडता कर्मयोगही याच अध्यायात सुरू होतो. त्यामुळे, हा अध्याय अधिकच महत्त्वाचा ठरतो. तात्त्विक सुभाषिते असलेले चरण निवडायचे तर सारे उद्यानच खुडून घ्यावे लागेल. विषयानुरूप काही आपण पाहूच.

## श्रेय कोणते ?

कृपा, विषाद, क्लैब्य, हृदयदौर्बल्य इत्यादींनी युक्त असा अर्जुन, 'धर्म संमूढचेत' म्हणजे कर्तव्य आणि अकर्तव्य यांबाबत गोंधळलेला होऊन श्रीकृष्णाला म्हणतो, 'यत् श्रेयः स्यात् निश्चितं ब्रूहि तत् मे '– 'जे कल्याणकारक असेल ते निश्चितपणे मला सांग' (अ. २ श्लोक ७)

अर्जुनाच्या या स्वच्छ प्रश्नाला श्रीकृष्णाने दिलेले उत्तरही निःसंदिग्धच म्हणावे लागेल.

## तीन मुद्दे

श्रीकृष्णाने हे उत्तर देताना तीन मुद्द्यांना हात घातला आहेः आत्मज्ञान, कर्मयोग, व ज्ञानयोग्याची लक्षणे.

श्लोक ११ ते ३०, विषय आहे 'आत्मज्ञान.' देह अनित्य आहे व आत्मा नित्य आहे. (अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः). आत्मा कधी जन्मत नाही, कधी मरत नाही. (न जायते म्रियते वा कदाचित्). शरीराचा नाश करता येत असला तरी आत्म्याचा नाश करता येत नाही, (न हन्यते हन्यमाने शरीरे). जो जन्मतो, तो मरतच असतो, आणि जो मरतो त्याचा जन्मही निश्चितच असतो; म्हणून ह्या अपरिहार्य गोष्टींबद्दल शोक करणे योग्य नाही. (जातस्य हि ध्रुवो मृत्युः ध्रुवं जन्म मृतस्य च। तस्मात् अपरिहार्ये अर्थे न त्वं शोचितुम् अर्हसि.) देह आणि आत्मा यांतील फरक ध्यानी बाळगल्यास

मोह-शोक जातील. संसारबीजभूत असे हे शोकमोह आत्मज्ञानाखेरीज नाहीसे होऊ शकत नाहीत. म्हणून 'आत्मज्ञान' हाच भगवद्गीतेचा विषय आहे, असे श्रीशंकराचार्य मानतात.

पण नुसते बौद्धिक आत्मज्ञान काम देत नाही. 'आत्मा अमर आहे' हा सिद्धांत समजला; पण मानलेला सिद्धांत आचरण्यासाठी आहे, हे विसरून चालणार नाही. आचरणाच्या वेळी तत्त्वज्ञान विसरले जाते. आत्मज्ञान कृतीत उतरविणे हाच कर्मयोग.

ज्ञान आणि कर्म यांविषयी गीता म्हणते, 'बुद्धियोगापेक्षा म्हणजे साम्य-बुद्धीपेक्षा कर्म अतिनिकृष्ट आहे. निष्काम कर्म विसरले जाऊन, कर्मयोगी म्हणविणारे 'फलार्थी' बनतात म्हणून असे होते. हे टाळण्यासाठी, साम्यबुद्धीत आश्रय मिळावा अशी इच्छा करावी (अ. २, श्लोक ४९). मोहकलिलता म्हणजे कलुषता घालविणारी 'सांख्यबुद्धि' व तीच 'मोक्षदा' कशी, हे श्लोक ३९ ते ५३ यांत वर्णिले आहे.

## काही शब्दार्थ

हा भाग समजण्यासाठी श्रीशंकराचार्यांनी दिलेले काही शब्दार्थ पाहणे उपकारक ठरेल. सांख्य म्हणजे परमार्थवस्तुविषय; बुद्धी म्हणजे ज्ञान; (सिद्धांताचे व सिद्धांत अमलात आणण्याच्या युक्तीचे); व्यवसायात्मिका म्हणजे निश्चय हा जिचा स्वभावच आहे अशी एकच; अव्यवसायी म्हणजे प्रमाणांनी उत्पन्न होणारी विवेकबुद्धी ज्यांना नाही असे, अविवेकी; समाधी म्हणजे (पुरुषाच्या म्हणजे परमेश्वराच्या उपभोगासाठी सर्व काही जेथे नीट साठविले जाते ते स्थान) अंतःकरण; त्रैगुण्यविषय वेद म्हणजे ज्यांना 'संसाराला' प्रकाशित करावयाचे आहे ते वेद; निस्त्रैगुण्य म्हणजे निष्काम; निर्द्वंद्व म्हणजे सुख आणि दुःख यांपासून दूर गेलेले; निर्योगक्षेम म्हणजे योग आणि क्षेम या दोन्हीबद्दलची बुद्धी ज्यांची गेलेली आहे असे; योग म्हणजे न मिळवलेले मिळविणे; क्षेम म्हणजे मिळविलेल्याचे रक्षण करणे; आत्मवान् म्हणजे अप्रमत्त (!) योग म्हणजे कर्मयोग, समाधियोग, समत्व.

आत्मज्ञान आचरणात आणताना पुष्कळच अडचणी ओलांडाव्या लागतात. त्रिगुणात्मक संसार व त्यालाच उजळविणारे वेद, यांना बाजूला सारणे कठीण

जाते. योगक्षेम सुद्धा स्वतः वाहणे निषिद्ध होय. सतत आत्मानुसंधान कशाने बरे साधेल ?

५४ ते ७२ या एकोणवीस श्लोकांत स्थितप्रज्ञलक्षणे म्हणजेच ज्ञानयोग्याची लक्षणे सांगितली आहेत. या प्रवचनात 'वशे हि यस्य इंद्रियाणि' म्हणजे 'इंद्रिये वश झाली ज्या' असे स्थितप्रज्ञ लक्षण प्रामुख्याने सांगितले आहे. दहा श्लोक याच विषयासाठी खर्ची पडले आहेत.

इंद्रियांचा संयम हे स्थितप्रज्ञतेचे 'साधन' म्हटले असते तर प्रामाणिक साधकाला चटकन कामाला लागता आले असते. पण ते स्थितप्रज्ञतेचे 'लक्षण' सांगितले आहे.

विषयांत रस असतो म्हणजे मनुष्याला विषयांत प्रेम असते. विषयांपासून इंद्रिये आवरून घेणे, हा इंद्रियसंयमाचा केवळ एक भाग म्हणता येईल. पण तेवढयाने, त्या विषयातील 'रस' आवरला गेला असे म्हणता येणार नाही. विषयच नव्हे तर 'रस' ही परत फिरावा यासाठी काय करावे ? 'परं दृष्ट्वा' म्हणजे 'परमार्थतत्त्व' प्राप्त करून घेणे हाच त्यासाठी उपाय !

इंद्रिये वश होण्यासाठी त्यांची मुस्कटदाबी कामास येणार नाही; ती सुद्धा 'आत्मवश्य' झाली पाहिजेत. नुसत्या इंद्रियदमनाने 'प्रसन्नता' लाभेलच असे नाही. प्रसन्नता तर आवश्यक आहे, प्रसन्नतेवाचून बुद्धी स्थिर होऊच शकत नाही.

एकूण, स्थितप्रज्ञ कसा असतो, या प्रश्नाचे उत्तर आहे — तो 'संयमी' म्हणजे इंद्रिये जिंकलेला व योगी, परमार्थतत्त्व पाहणारा 'मुनी' आणि काम-कामी नसलेला म्हणजे 'संन्यासी' असतो; संयमी, जागृत आणि संन्यासी !

विनोबांनी 'संपूर्ण जीवनशास्त्र' त्रिभागून सांगितले आहे, ते हृद्य आहे — सांख्यबुद्धी म्हणजे जीवनाचे निर्गुणत्व, योगबुद्धी म्हणजे सगुणत्व आणि स्थितप्रज्ञता म्हणजे साकारता होय.

## प्रासंगिकतेमुळे आलेली तर्कदुष्टता

श्लोक ३१ ते ३८ या आठ श्लोकांत श्रीकृष्णाचे बोलणे तात्त्विक म्हणण्या-पेक्षा वकिली थाटाचे आहे. परिवार-नियोजनासंबंधी आजकाल प्रत्येक धर्म-शास्त्रातून आधार दिले जात आहेत. ते खोटे आहेत असे नाही पण तसेच ते परिवार-वृद्धीच्या प्रचारासाठीही दिले जाऊ शकतात. अशा प्रासंगिकतेमुळे

तात्त्विकतेला निश्चितपणे बाधा होते. इतकेच नव्हे तर त्या तत्त्वज्ञानाला मग दुर्बोधत्व येते.

अर्जुनाचा विषाद समजण्यासाठी, कुरुक्षेत्रावरील युद्धप्रसंग पहिल्या अध्यायात उपोद्घातवजा ठीक होता. वास्तविक तेवढयाने सुद्धा भगवद्गीतेची भूमिका विद्वानांमध्ये विवाद्यच झाली आहे. कोणी म्हणतात ' युद्धभूमीवर, एवढे तत्त्वज्ञान समजावून द्यायला व घ्यायला वेळच कसा मिळाला ?' कोणी म्हणतात, ' कुरुक्षेत्र म्हणजे प्रत्यक्ष रणभूमी नसून ज्याचे त्याचे अंतःकरण हेच सुष्ट–दुष्ट विचारांचे कुरुक्षेत्र होय. किंबहुना लोकांना संन्यस्तवृत्तीपासून परावृत्त करून, स्वराज्यसंपादनार्थ प्रवृत्त करावयाचे, ह्या हेतूने लोकमान्यांना गीतेचे रहस्य कर्मयोगात सापडले, असेही म्हणण्यात येते. तद्वतच ' युद्ध कर, कारण तो तुझा धर्म आहे, ती एक सुसंधी आहे. युद्ध न करणे ' पाप ' ठरेल, युद्धाने तुला कीर्ती मिळेल. युद्ध न केल्यास तुझी अपकीर्ती होईल. युद्ध केल्याने स्वर्ग किंवा राज्य यांपैकी एक काहीतरी निश्चितच मिळेल. युद्ध करणे पाप नाही ' हा या आठ श्लोकांचा सारांश पाहिला म्हणजे ह्या वकिली थाटामुळे, तत्त्वज्ञान अंमळ तर्कदुष्ट झाले आहे, असे म्हणणे चूक ठरणार नाही.

ह्या आठ श्लोकांबाबत विनोबांचे म्हणणेही तसेच तर्कदुष्ट म्हणण्यापेक्षा अनाकलनीय वाटते. विनोबा म्हणतात, जन्माबरोबरच स्वधर्मही जन्मतो; तो आपल्या जन्माचा हेतू असतो. स्वधर्म हा आश्रय कधीही सोडू नये हा जीवनाचा एक मूलभूत सिद्धान्त ठरतो.

क्षत्रियकुलात जन्मलेल्या अर्जुनाचा स्वधर्म म्हणजे अर्जुनाच्या जन्माचा हेतू ' युद्ध करणे ' ! जन्मसिद्ध चातुर्वर्ण्याला किती पोषक आहे, हा योगायोग; नाहीं का ? व्यक्तीच्या जन्माबरोबर तिचा स्वधर्मही जन्मतो, तो जाणायला काही काळ नको का जायला ? आणि त्या काळातच तथाकथित स्वधर्म बदलण्याची शक्यता असू शकते की नाही ? असो.

## कर्मापेक्षा ज्ञान श्रेष्ठ

सांख्ययोगपर ह्या अध्यायात ' कर्मापेक्षा ज्ञान श्रेयस्कर ' हे ठामपणे सांगितले आहे. हे ज्ञान कशाने होईल ? सांख्ययोगाने ? कर्मयोगाने ? की भक्तीने ?

साधकाने निराश कधीच होऊ नये, त्याने आपली साधकाची सर्व युक्ती

वापरून, ती कमी पडेल तेथे ' भक्तीची ' जोड द्यावी, असा विनोबांचा अभिप्राय आहे.

### परिशिष्ट

धर्मसंमूढता घालविण्यासाठी ' आत्मज्ञानी ' व्हावे, हाच ' सांख्ययोग '.

* * *

## अध्याय ३ रा

अध्यायाचे नाव ' कर्मयोग '. स्वराज्याचा मंत्र देणारे मंत्रद्रष्टे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आधी करतात व मग सांगतात. प्रभावी भाष्यकार श्रीशंकराचार्यांनंतर स्वतंत्र प्रतिभेने भगवद्गीतेवर टीका करण्याची कुवत दाखविली टिळकांनीच. आचार्य हे जगद्गुरु खरे, पण सामान्यजनांना त्यांच्यापेक्षाही टिळकच आकलनीय ठरले. टिळकांचा कर्मयोग लोकांना समजला असेल नसेल; पण त्यांचे ' कर्म ' लोकांना नक्की समजले. ज्याच्या आधाराने ते कर्म टिळकांनी लोकांना समजावून सांगितले, तो हा ' कर्मयोग ' नावाचा बलवंतप्रिय तिसरा अध्याय ?

### निष्ठायोग्य कर्मयोग

' कर्मण्येवाधिकारस्ते ' ह्या श्लोकाने कर्मयोगाची सुरुवात आधीच्याच अध्यायात होते. सांख्ययोग तसाच कर्मयोग देखील निष्ठायोग्यच. अनुष्ठेयाचे तात्पर्य म्हणजे निष्ठा, असे आचार्य सांगतात. अमुक साधनेने कर्मयोग साधेल, असे सांगता येत नाही. कर्मयोग ही सुद्धा सांख्ययोगाप्रमाणेच निष्ठा-प्राप्य ' स्थिती' आहे.

### सिद्धांतरूप विधाने

कर्मासंबंधीची सिद्धान्तरूप विधाने ४ ते ८ या श्लोकांत आहेत, ती अशी :

( १ ) कर्म आरंभिलेच नाही म्हणजे ते नैष्कर्म्य होत नाही.

( २ ) कर्माचा त्याग केला, म्हणजे तो संन्यास होत नाही.

( ३ ) कर्म अटळ आहे, कर्माशिवाय राहणे क्षणभरही अशक्य आहे.

( ४ ) कर्मेंद्रिये आवरली तरी मन हे इंद्रिय आवरले जात नाही; आणि मग, ' कर्मेंद्रिये संयमित पण मन मोकाट ' अशा स्थितीत ' मिथ्याचार ' घडतो, तो टाळावा.

( ५ ) अकर्मापेक्षा कर्म श्रेष्ठ होय. कर्म म्हणजे शास्त्रोपदिष्ट नियत कर्म.

## यज्ञार्थ कर्म

नियतकर्मासाठी ९ ते १६ हे आठ श्लोक खर्ची पडले आहेत. यज्ञकर्म हे शास्त्रोपदिष्ट नियत कर्म होय. हे यज्ञप्रकरण एकंदरीत कठीणच आहे समजायला. हे प्रकरण ' अधि-आत्म ' मानावे की ' अधि-भूत ' मानावे, कळत नाही. ' त्यागपूर्वक भोग ' या दृष्टीने यज्ञाचे महत्त्व सहज उमगते; पण ' यज्ञापासून पर्जन्य होतो ' ही प्रक्रिया भौतिक विज्ञानात बसत असेल असे म्हणवत नाही.

परमेश्वराचे निश्वसित, ते वेद. त्या वेदांनी यज्ञ सांगितला. यज्ञ करायचा म्हणजे ' कर्म ' करायचे. एवंच कर्म हे ब्रह्मोद्भव आहे ! आणि म्हणून, जो कर्म करणार नाही ( म्हणजे यज्ञ करणार नाही ) तो अघायू होय, तो इंद्रियाराम होय. अघायू म्हणजे पापी. इंद्रियाराम म्हणजे इंद्रियांत रमणारे आणि आत्म्यात न रमणारे.

स्वार्थासाठी कर्म करून ' मुक्तसंगत्व ' साधत नाही; पण यज्ञासाठी कर्म करून ते सुलभतेने साधते.

असक्त राहून कर्म करणे आत्मतृप्तालाच साधते, आत्मज्ञान्यालाच साधते. टिळकांनी स्वतःला आत्मज्ञानी म्हटले नाही. असक्त राहून म्हणण्यापेक्षा ' यज्ञार्थच ' कर्म करणे त्यांना साधले; नाही का ?

## लोकसंग्रहार्थ कर्म

कर्माचा दुसरा उद्देश ' लोकसंग्रह ' हा होय. लोकसंग्रह म्हणजे ' लोकस्य उन्मार्गप्रवृत्तिनिवारण ' – सामान्य जनांची प्रवृत्ती आत्मविरोधी मार्गाकडे होऊ नये म्हणून श्रेष्ठ लोकांना ( स्वतःसाठी गरज नसताना ) कर्म करणे आवश्यक ठरते. ( श्लोक २० ते २६ ).

## कर्माची लक्षणे

कर्माचा उद्देश ' ब्रह्मनिष्ठा ' असो की ' लोकसंग्रह ' असो, ज्याला ' कर्म-

जाते. योगक्षेम सुद्धा स्वतः वाहणे निषिद्ध होय. सतत आत्मानुसंधान कशाने बरे साधेल ?

५४ ते ७२ या एकोणवीस श्लोकांत स्थितप्रज्ञलक्षणे म्हणजेच ज्ञानयोग्याची लक्षणे सांगितली आहेत. या प्रवचनात ' वशे हि यस्य इंद्रियाणि ' म्हणजे ' इंद्रिये वश झाली ज्या ' असे स्थितप्रज्ञ लक्षण प्रामुख्याने सांगितले आहे. दहा श्लोक याच विषयासाठी खर्ची पडले आहेत.

इंद्रियांचा संयम हे स्थितप्रज्ञतेचे ' साधन ' म्हटले असते तर प्रामाणिक साधकाला चटकन कामाला लागता आले असते. पण ते स्थितप्रज्ञतेचे ' लक्षण ' सांगितले आहे.

विषयांत रस असतो म्हणजे मनुष्याला विषयांत प्रेम असते. विषयांपासून इंद्रिये आवरून घेणे, हा इंद्रियसंयमाचा केवळ एक भाग म्हणता येईल. पण तेवढयाने, त्या विषयातील ' रस ' आवरला गेला असे म्हणता येणार नाही. विषयच नव्हे तर ' रस ' ही परत फिरावा यासाठी काय करावे ? ' परं दृष्ट्वा ' म्हणजे ' परमार्थतत्त्व ' प्राप्त करून घेणे हाच त्यासाठी उपाय !

इंद्रिये वश होण्यासाठी त्यांची मुस्कटदाबी कामास येणार नाही; ती सुद्धा ' आत्मवश्य ' झाली पाहिजेत. नुसत्या इंद्रियदमनाने ' प्रसन्नता ' लाभेलच असे नाही. प्रसन्नता तर आवश्यक आहे, प्रसन्नतेवाचून बुद्धी स्थिर होऊच शकत नाही.

एकूण, स्थितप्रज्ञ कसा असतो, या प्रश्नाचे उत्तर आहे — तो ' संयमी ' म्हणजे इंद्रिये जिंकलेला व योगी, परमार्थतत्त्व पाहणारा ' मुनी ' आणि काम-कामी नसलेला म्हणजे ' संन्यासी ' असतो; संयमी, जागृत आणि संन्यासी !

विनोबांनी ' संपूर्ण जीवनशास्त्र ' त्रिभागून सांगितले आहे, ते हृद्य आहे — सांख्यबुद्धी म्हणजे जीवनाचे निर्गुणत्व, योगबुद्धी म्हणजे सगुणत्व आणि स्थितप्रज्ञता म्हणजे साकारता होय.

## प्रासंगिकतेमुळे आलेली तर्कदुष्टता

श्लोक ३१ ते ३८ या आठ श्लोकांत श्रीकृष्णाचे बोलणे तात्त्विक म्हणण्या-पेक्षा वकिली थाटाचे आहे. परिवार-नियोजनासंबंधी आजकाल प्रत्येक धर्म-शास्त्रातून आधार दिले जात आहेत. ते खोटे आहेत असे नाही पण तसेच ते परिवार-वृद्धीच्या प्रचारासाठीही दिले जाऊ शकतात. अशा प्रासंगिकतेमुळे

तात्विकतेला निश्चितपणे बाधा होते. इतकेच नव्हे तर त्या तत्त्वज्ञानाला मग दुर्बोधत्व येते.

अर्जुनाचा विषाद समजण्यासाठी, कुरुक्षेत्रावरील युद्धप्रसंग पहिल्या अध्यायात उपोद्घातवजा ठीक होता. वास्तविक तेवढयाने सुद्धा भगवद्गीतेची भूमिका विद्वानांमध्ये विवाद्यच झाली आहे. कोणी म्हणतात 'युद्धभूमीवर, एवढे तत्त्वज्ञान समजावून द्यायला व घ्यायला वेळच कसा मिळाला?' कोणी म्हणतात, 'कुरुक्षेत्र म्हणजे प्रत्यक्ष रणभूमी नसून ज्याचे त्याचे अंतःकरण हेच सुष्ट-दुष्ट विचारांचे कुरुक्षेत्र होय. किंबहुना लोकांना संन्यस्तवृत्तीपासून परावृत्त करून, स्वराज्यसंपादनार्थ प्रवृत्त करावयाचे, ह्या हेतूने लोकमान्यांना गीतेचे रहस्य कर्मयोगात सापडले, असेही म्हणण्यात येते. तद्वतच 'युद्ध कर, कारण तो तुझा धर्म आहे, ती एक सुसंधी आहे. युद्ध न करणे 'पाप' ठरेल, युद्धाने तुला कीर्ती मिळेल. युद्ध न केल्यास तुझी अपकीर्ती होईल. युद्ध केल्याने स्वर्ग किंवा राज्य यांपैकी एक काहीतरी निश्चितच मिळेल. युद्ध करणे पाप नाही' हा या आठ श्लोकांचा सारांश पाहिला म्हणजे ह्या वकिली थाटामुळे, तत्त्वज्ञान अंमळ तर्कदुष्ट झाले आहे, असे म्हणणे चूक ठरणार नाही.

ह्या आठ श्लोकांबाबत विनोबांचे म्हणणेही तसेच तर्कदुष्ट म्हणण्यापेक्षा अनाकलनीय वाटते. विनोबा म्हणतात, जन्माबरोबरच स्वधर्मही जन्मतो; तो आपल्या जन्माचा हेतू असतो. स्वधर्म हा आश्रय कधीही सोडू नये हा जीवनाचा एक मूलभूत सिद्धान्त ठरतो.

क्षत्रियकुलात जन्मलेल्या अर्जुनाचा स्वधर्म म्हणजे अर्जुनाच्या जन्माचा हेतू 'युद्ध करणे'! जन्मसिद्ध चातुर्वर्ण्याला किती पोषक आहे, हा योगायोग; नाहीं का? व्यक्तींच्या जन्माबरोबर तिचा स्वधर्मही जन्मतो, तो जाणायला काही काळ नको का जायला? आणि त्या काळातच तथाकथित स्वधर्म बदलण्याची शक्यता असू शकते की नाही? असो.

## कर्मापेक्षा ज्ञान श्रेष्ठ

सांख्ययोगपर ह्या अध्यायात 'कर्मापेक्षा ज्ञान श्रेयस्कर' हे ठामपणे सांगितले आहे. हे ज्ञान कशाने होईल? सांख्ययोगाने? कर्मयोगाने? की भक्तीने?

साधकाने निराश कधीच होऊ नये, त्याने आपली साधकाची सर्व युक्ती

वापरून, ती कमी पडेल तेथे ' भक्तीची ' जोड द्यावी, असा विनोबांचा अभिप्राय आहे.

### परिशिष्ट

धर्मसंमूढता घालविण्यासाठी ' आत्मज्ञानी ' व्हावे, हाच ' सांख्ययोग '.

* * *

## अध्याय ३ रा

अध्यायाचे नाव ' कर्मयोग '. स्वराज्याचा मंत्र देणारे मंत्रद्रष्टे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आधी करतात व मग सांगतात. प्रभावी भाष्यकार श्रीशंकराचार्यांनंतर स्वतंत्र प्रतिभेने भगवद्गीतेवर टीका करण्याची कुवत दाखविली टिळकांनीच. आचार्य हे जगद्गुरु खरे, पण सामान्यजनांना त्यांच्यापेक्षाही टिळकच आकलनीय ठरले. टिळकांचा कर्मयोग लोकांना समजला असेल नसेल; पण त्यांचे ' कर्म ' लोकांना नक्की समजले. ज्याच्या आधाराने ते कर्म टिळकांनी लोकांना समजावून सांगितले, तो हा ' कर्मयोग ' नावाचा बलवंतप्रिय तिसरा अध्याय ?

### निष्ठायोग्य कर्मयोग

' कर्मण्येवाधिकारस्ते ' ह्या श्लोकाने कर्मयोगाची सुरुवात आधीच्याच अध्यायात होते. सांख्ययोग तसाच कर्मयोग देखील निष्ठायोग्यच. अनुष्ठेयाचे तात्पर्य म्हणजे निष्ठा, असे आचार्य सांगतात. अमुक साधनेने कर्मयोग साधेल, असे सांगता येत नाही. कर्मयोग ही सुद्धा सांख्ययोगाप्रमाणेच निष्ठा-प्राप्य ' स्थिती' आहे.

### सिद्धांतरूप विधाने

कर्मासंबंधीची सिद्धान्तरूप विधाने ४ ते ८ या श्लोकांत आहेत, ती अशी :

( १ ) कर्म आरंभिलेच नाही म्हणजे ते नैष्कर्म्य होत नाही.

( २ ) कर्माचा त्याग केला, म्हणजे तो संन्यास होत नाही.

( ३ ) कर्म अटळ आहे, कर्माशिवाय राहणे क्षणभरही अशक्य आहे.

( ४ ) कर्मेंद्रिये आवरली तरी मन हे इंद्रिय आवरले जात नाही; आणि मग, ' कर्मेंद्रिये संयमित पण मन मोकाट ' अशा स्थितीत ' मिथ्याचार ' घडतो, तो टाळावा.

( ५ ) अकर्मापेक्षा कर्म श्रेष्ठ होय. कर्म म्हणजे शास्त्रोपदिष्ट नियत कर्म.

## यज्ञार्थ कर्म

नियतकर्मासाठी ९ ते १६ हे आठ श्लोक खर्ची पडले आहेत. यज्ञकर्म हे शास्त्रोपदिष्ट नियत कर्म होय. हे यज्ञप्रकरण एकंदरीत कठीणच आहे समजायला. हे प्रकरण ' अधि-आत्म ' मानावे की ' अधि-भूत ' मानावे, कळत नाही. ' त्यागपूर्वक भोग ' या दृष्टीने यज्ञाचे महत्त्व सहज उमगते; पण ' यज्ञापासून पर्जन्य होतो ' ही प्रक्रिया भौतिक विज्ञानात बसत असेल असे म्हणवत नाही.

परमेश्वराचे निश्वसित, ते वेद. त्या वेदांनी यज्ञ सांगितला. यज्ञ करायचा म्हणजे ' कर्म ' करायचे. एवंच कर्म हे ब्रह्मोद्भव आहे ! आणि म्हणून, जो कर्म करणार नाही ( म्हणजे यज्ञ करणार नाही ) तो अघायू होय, तो इंद्रियाराम होय. अघायू म्हणजे पापी. इंद्रियाराम म्हणजे इंद्रियांत रमणारे आणि आत्म्यात न रमणारे.

स्वार्थासाठी कर्म करून ' मुक्तसंगत्व ' साधत नाही; पण यज्ञासाठी कर्म करून ते सुलभतेने साधते.

असक्त राहून कर्म करणे आत्मतृप्तालाच साधते, आत्मज्ञान्यालाच साधते. टिळकांनी स्वतःला आत्मज्ञानी म्हटले नाही. असक्त राहून म्हणण्यापेक्षा ' यज्ञार्थच ' कर्म करणे त्यांना साधले; नाही का ?

## लोकसंग्रहार्थ कर्म

कर्माचा दुसरा उद्देश ' लोकसंग्रह ' हा होय. लोकसंग्रह म्हणजे ' लोकस्य उन्मार्गप्रवृत्तिनिवारण ' – सामान्य जनांची प्रवृत्ती आत्मविरोधी मार्गाकडे होऊ नये म्हणून श्रेष्ठ लोकांना ( स्वतःसाठी गरज नसताना ) कर्म करणे आवश्यक ठरते. ( श्लोक २० ते २६ ).

## कर्माची लक्षणे

कर्माचा उद्देश ' ब्रह्मनिष्ठा ' असो की ' लोकसंग्रह ' असो, ज्याला ' कर्म-

य ोग ' म्हणता येईल, अशा कर्माची लक्षणे पुढीलप्रमाणे सांगितली आहेत—

( १ ) प्रकृती कर्मे करते.

( २ ) आत्मा कर्मे करीत नाही.

( ३ ) कर्मे ईश्वरार्पित असतात.

( ४ ) कर्म करणारा ' निमित्तमात्र ' असतो व तो मात्र ' श्रद्धावान ' असतो.

( ५ ) ज्ञान्यालाही कर्म सुटत नाही. ( श्लोक २७ ते ३३ )

## कर्मयोगी कोण ?

कर्मयोगी कोण, ह्या प्रश्नाचे उत्तर, ' स्वधर्म ' असे कर्म जो आचरतो, तो. पण ' स्वधर्म ' म्हणजे तरी काय ? रागद्वेषविरहित माणसाकडून प्रकृती जे कर्म करविते, तेच त्याचा ' स्वधर्म '. तेच कर्म रागद्वेषाच्या आहारी जाऊन झाले की तो होतो ' परधर्म ' असे आचार्य म्हणतात.

## उद्धरेदात्मनात्मानम्

रागद्वेषांपासून मुक्त राहण्यासाठी काय करावे ? इंद्रिये ताब्यात ठेवावीत. इंद्रिये, मन व बुद्धी देखील वश असली पाहिजे. आला पुनः प्रश्न-इंद्रियांवर ताबा हे साधन की लक्षण ?

इंद्रिये, मन व बुद्धी ही श्रेष्ठ खरी, पण त्यांपेक्षाही आत्मा श्रेष्ठ होय, हे लक्षात ठेवून त्या आत्म्यासाठी इतरांना आवरावे.

आत्म्याच्या म्हणजे आत्मज्ञानाच्या आड येणारा दुर्जय शत्रू ' काम ' होय; या कामाला ठार केल्याखेरीज रागद्वेष थिजत नाहीत. सुसंस्कृत मनाने असंस्कृत मनाला शिकवीत शिकवीत किंवा आवरत आवरत कामशत्रूला ठार करणे शक्य असावे.

पहिल्या अध्यायात ' महत्पापा 'चा उल्लेख आहे. त्यानंतर पुनः एकदा पापाचा उल्लेख अर्जुनाने या अध्यायात आवर्जून केला आहे. ' स्वतःची इच्छा नसतानाही मनुष्य पाप करतो, ते का ? ' हा एक अत्यंत मौलिक प्रश्न आहे.

## पाप आणि पापमुक्तता

जगात पाप कसे शिरले यासंबंधीची एक रम्य कथा बायबलात आहे. ती बुद्धीला न पटणारी आहे. पण ख्रिस्तावताराचे कार्य मात्र बुद्धिगम्य असून त्याचा

गाभा ' पापमुक्ती ' हाच आहे. स्वतःच स्वतःला काबूत ठेवून, पाप करायला लावणाऱ्या कामशत्रूला ठार करणे अशक्यप्रायच आहे. बायबल आणि गीता यांचे एकमत अठराव्या अध्यायात मात्र दिसते. ' अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि ' हे भगवद्वचन ख्रिस्तवचनाशी जुळते आहे. पण भक्तियोगात शिरणे, येथे अप्रस्तुत होईल.

### परिशिष्ट

धर्मसंमूढता घालविण्यासाठी ' स्वधर्म '-कर्मे करावीत, हाच कर्मयोग.

* * *

## अध्याय ४ था

या अध्यायाचे नाव ' ज्ञानकर्मसंन्यासयोग. ' ज्ञानाने केलेला कर्मसंन्यास. अज्ञानातून उत्पन्न झालेला अंतःकरणातील संशय, ज्ञानाच्या साह्याने नाहीसा करून, आत्म्याचे सम्यक् दर्शन व्हावे यासाठी कर्मे करणे, हे त्याचे अधिक स्पष्टीकरण होईल. ज्ञाननिष्ठालक्षण असा जो संन्यास दुसऱ्या अध्यायात सांगितला, तो निवृत्तिलक्षण वेदार्थ होय; कर्मयोग म्हणून जो उपाय तिसऱ्या अध्यायात सांगितला तो प्रवृत्तिलक्षण वेदार्थ होय. येथे वेदार्थ संपला.

खरे तर, या अध्यायाला ' ज्ञान-कर्म-योग ' हे नाव शोभून दिसेल, कारण यात ज्ञानयोग आहे व कर्मयोगही आहे.

### योग म्हणजे काय ?

भगवद्गीता हे योगशास्त्र आहे. म्हणजे कशाचे शास्त्र आहे ? योग म्हणजे उपाय (२ : ३९); योग म्हणजे न मिळविलेले मिळविणे (२ : ४५); योग म्हणजे सिद्धी व असिद्धी यांत फरक न करणे, दोन्ही सारखे लेखणे ( २ : ४८ ); योग म्हणजे —ने युक्त असणे ( २ : ४९ ); योग म्हणजे समत्वबुद्धी ( २ : ५० ); योग म्हणजे विवेकप्रज्ञा ( २ : ५३ ). ह्यांतून काय लक्षात घ्यावे ?

योग म्हणजे उपाय हा एक अर्थ, आणि योग म्हणजे समत्वबुद्धी हा दुसरा अर्थ; हे दोन अर्थ लक्षात घ्यावे लागतील. तदनुसार, ज्ञानयोग म्हणजे ज्ञान हाच

उपाय; आणि योगी म्हणजे समत्वबुद्धी ज्याला आहे असा ज्ञान योगी किंवा कर्मयोगी.

## परमेश्वराची दिव्य जन्मकर्मे

पहिल्या तीन श्लोकांत योगाचा इतिहास सांगितला आहे. नष्टप्राय झालेल्या या योगाचा पुनरुद्धार की पुनरुच्चार कृष्णाने अर्जुनाजवळ केला.

ह्या इतिहासाच्या अनुषंगाने 'परमेश्वराचे जन्म' या विषयावर प्रकाश टाकण्यासाठी ५ ते ९ हे पाच श्लोक आले आहेत. देव 'अज' आहे; म्हणजे 'ज्याला जन्म नाही असा' आहे. हे खरे; तरी पण 'तो जन्म घेतो' हेही खरेच. देव जन्म का घेतो? याचे उत्तर,— अधर्माचे उत्थान झाले असता धर्माच्या स्थापनेसाठी म्हणजे संस्थापनेसाठी. मात्र, देवाचे देहधारण मनुष्यांच्या देहधारणापेक्षा वेगळे असते. देवाचे देहवान असणे 'दिव्य'; जन्म घेऊन देव करतो ती कर्मेही 'दिव्य'च!

परमेश्वराची दिव्य जन्मकर्मे सर्वच माणसे सारखेपणाने समजू शकत नाहीत. काही लोक सेच्छ तर काही निरिच्छ असतात. त्यांच्या त्यांच्या कुवतीनुसार ते परमेश्वराला जाणू शकतात. ज्यांना कर्माची सिद्धी हवी असते ते मुळी परमेश्वराला भजतच नाहीत, ते अन्य देवतांनाच भजतात.

कर्म आणि चातुर्वर्ण्यविहित कर्म ही भानगड फक्त मनुष्यांना लागू आहे. देव माणसासारखा देहधारी झाला तरी त्याला ना वर्ण, ना वर्णविहित कर्म.

मनुष्यांसाठी कर्माचे प्रकार तीन : कर्म, विकर्म आणि अकर्म. कर्म म्हणजे शास्त्रविहित कर्म. विकर्म म्हणजे शास्त्रनिषिद्ध कर्म. आणि अकर्म म्हणजे काही न करणे. ( विनोबांनी विकर्माचा अर्थ विशेष कर्म, असा घेतला आहे. ) कर्म विकर्म आणि अकर्म यांपैकी कोणतेही बंधनकारकच असते. फक्त 'यज्ञार्थ' कर्म बंधनकारक नसते. सर्वच ब्रह्म अनुभवणाराला कर्म 'न केल्यासारखेच' होते.

## यज्ञार्थ कर्म

यज्ञार्थ कर्म अंमळ विस्ताराने स्पष्ट केले आहे. यज्ञ म्हणजे अग्नीत जाळणे. तीळ, तांदूळ, तूप हे द्रव्य अग्नीत जाळणे हा झाला द्रव्ययज्ञ. द्रव्ययज्ञापर्यंत मजल मारणारे पुष्कळ होऊन गेले व आहेतही. पण विषय, इंद्रिये, प्राण या सर्वांचाच

यज्ञ करायचा असतो. एक द्रव्ययज्ञ तर दुसरा ज्ञानयज्ञ. द्रव्ययज्ञाचाही यज्ञ ज्ञानाग्नीत करावयाचा असतो.

'ज्ञानाने केलेला कर्मसंन्यास' असा जो विग्रह, 'ज्ञानकर्मसंन्यास' या समासाचा केला, तो यामुळेच. याप्रमाणे, या जगात मनुष्याला कर्मे करावीच लागतात; ती त्याने यज्ञार्थ करावीत आणि यज्ञाची परिसमाप्ती ज्ञानातच व्हावी.

### ज्ञान

३४ ते ४० या सात श्लोकांत, ज्ञानाची साधने म्हणून प्रणिपात, परिप्रश्न, सेवा, श्रद्धा आणि संयतेंद्रियता या गोष्टी सांगितल्या. ज्ञानाचे स्वरूप 'अग्नी-प्रमाणे परमपवित्र आहे' असे वर्णिले. आणि मोहनाश, पापमोचन व शांतिलाभ हे ज्ञानाचे माहात्म्य सांगितले आहे.

देवाच्या जन्मकर्मांत 'ज्ञानोत्तरता' आहे; मनुष्याच्या जन्मकर्मांत 'ज्ञान-पूर्वता' असली पाहिजे. म्हणजेच, मनुष्याने आपली कर्मे करताना 'ज्ञान' हे ध्येय सतत डोळ्यांसमोर ठेवले पाहिजे.

### परिशिष्ट

'स्वधर्मकर्मे करताना त्यांची परिसमाप्ती ज्ञानातच झाली पाहिजे.

* * *

## अध्याय ५ वा

ह्या अध्यायाचे नाव 'संन्यासयोग'. ज्ञानयोग सांगून झाला, कर्मयोग सांगून झाला, ज्ञान-कर्म-संन्यासयोगही सांगून झाला. पुनः आता संन्यास घोळण्याचे कारण काय? निवृत्तिलक्षण आणि प्रवृत्तिलक्षण असा धर्म असल्यामुळे, ज्ञानाचा व कर्माचा सुंदर समन्वय साधला; धर्म-अधर्म, कर्म-अकर्म यांबद्दलचा संशयही फिटला. आता पुनः तोच तो विषय का? अशा घोळानेच धर्मग्रंथ सामान्यजनांना दुर्बोध होतात व बाजूला ठेवावेसे वाटतात, असे वाटले. असो.

अकर्म आणि विकर्म यांचा प्रश्नच नाही. शास्त्रीय अनुष्ठेय कर्म तेवढेच विचारात घेऊन प्रश्न उपस्थित केला आहे– अशा कर्मांचा संन्यास श्रेयस्कर की अशा कर्मांचे अनुष्ठान श्रेयस्कर?

'दोन्हीही सारखीच श्रेयस्कर' हे मत अध्यक्षीय छापाचे वाटले तरी तेच बरोबर होय. कारण, कर्मे सोडण्याचा हेतू आणि कर्मे करण्याचा हेतू जर ज्ञानोत्पत्ती हाच आहे तर त्यांत तरतमभाव कसा दाखविता येईल?

तरीपण संन्यासप्रशस्तीसाठीच हा अध्याय असल्यामुळे, कर्मयोगापेक्षा कर्म-संन्यास श्रेष्ठ का, ते शोधलेच पाहिजे.

## कर्मयोगी व संन्यासी

कर्मयोगी व संन्यासी यांतील फरक पुढीलप्रमाणे मांडता येईल—

( १ ) कर्मयोगी कर्मे करतो; संन्यासी कर्म करीतच नाही. संन्याशातील 'देही' संन्यस्त असतो; स्व-भाव म्हणजे माया कर्मे करीत असते.

( २ ) कर्मयोगी स्वामीसाठी कर्मे करतो; संन्यासी स्वामीच बनतो.

( ३ ) कर्मयोगी फलसंगापुरेसाच संन्याशी असतो; संन्यासी तत्त्ववित् पूर्णपणे संन्यासी असतो.

( ४ ) कर्मयोगी ईश्वरार्पित कर्मांनी 'सत्त्वशुद्धी' प्राप्त करून घेतो आणि मग 'ब्रह्म' मिळवितो. या मार्गात सोपेपणा आहे. कर्मे न करता 'संन्यास' प्राप्त करणे कठिण आहे.

( ५ ) कर्मयोग्याला ज्ञान एकदम मिळत नाही, सत्त्वशुद्धी हा एक टप्पा आधी गाठावा लागतो; संन्यासी थेट ज्ञान गाठतो.

वरीलपैकी पाचवा मुद्दाच काय तो संन्यास श्रेष्ठ ठरविणारा म्हणता येईल.

शक्नोतीहैव यः सोढुं प्राक्शरीरविमोक्षणात् ।
कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥

ह्या श्लोकात सांगितलेले संन्याशाचे 'आधिक्य' विचारार्ह होय. वशी, देही, प्रभू, विभू—या पदवीला प्राप्त झालेला संन्यासी, कर्मयोग्याच्या मानाने अधिक विवेकी असतो; कामक्रोधाला तो बळी पडतच नाही.

## संन्यासी कसा असतो?

संन्यासी ब्रह्मनिर्वाण प्राप्त करून घेतो. ब्रह्मनिर्वाण म्हणज 'ब्रह्मात् निर्वृति'; निर्वृति म्हणजे मोक्ष. अशा संन्याशाला परमार्थतत्त्व कळल्यामुळे इतर सर्वच त्याला स्पष्टपणे कळते. त्रिगुणातीत झाल्यामुळे त्याला समदृष्टी लाभते. हर्ष-

शोकातीत झाल्यामुळे तो स्थिरबुद्धीचा असतो. क्षणभंगुर सुखाच्या पलीकडे गेल्यामुळे त्याला अक्षयसुख लाभते. रागद्वेषातीत, म्हणून संन्याशी सहिष्णू असतो. सर्वभूतहिते रत म्हणून तो अहिंसकही असतो. आणि ब्रह्मस्थित असल्यामुळे जन्ममरणयुक्त असतो.

या अध्यायावरील विनोबांचे प्रवचन ' साधक ' अवस्थेतूनच केलेले आहे, पूर्ण संन्यासी ( आणि पूर्णकर्मयोगीही ) व्याख्येतच राहणार, अशी कबुली देऊन विनोबा विचारतात, ' न करणे हे सुद्धा जेथे कर्म ठरते तेथे कर्मसंन्यास व्हावा तरी कसा ? '

## परिशिष्ट

कर्मसंन्यास हा मार्ग कर्मयोगापेक्षा अधिक थेटपणे मोक्षाकडे नेतो.

संग्रहालय
शाखा

## अध्याय ६ वा

हा अध्याय ' ध्यानयोगा 'चा. ध्यान हे साधन व योग हे साध्य. योग साधण्यासाठी ध्यान कसे करावे हे ह्या अध्यायात सांगितले आहे.

### योगी कोण ?

कर्मे करीत असतानाही जो फलाकांक्षा सोडूनच कर्मे करतो तो योगी. कर्मे सुटली आहेत अशा स्थितीत जितेंद्रिय असतो, तो योगी. संन्यासी तोच योगी. साधक दशेत असेल तो आरुरुक्षु. पण जितेंद्रिय, निष्कर्मा आणि सर्वसंकल्प संन्यासी अशाला योगारूढ म्हटले आहे. आरुरुक्षाला ध्यानयोग साधला की तो योगारूढ होतो.

### योग व समाधान

योगी का व्हावे ? सुख, शांती, समाधान मिळविण्यासाठी स्वतंत्रतेतील. शांती व व्यापकतेतील सुख मिळविण्यासाठी. ब्रह्मनिर्वाण हे सुखशांतीचे माहेर होय. योगी होण्याचा संकल्प दृढ असेल तरच ध्यानयोगाकडे लक्ष लागेल.

तपस्वी, ज्ञानी, कर्मी या सर्वांपेक्षा योगी श्रेष्ठ. आणि, योग्यांतही ' श्रद्धावान

योगी ' श्रेष्ठ ! श्रद्धावान योगी समाधानचित्त असतो. पारतंत्र्य व संकुचितता किंचिन्मात्र असली तरी त्यामुळे असमाधानच असते. अशा जीवनातून ' स्वतंत्र व व्यापक ' जीवनात जाणे हाच समाधानाचा उपाय होय. अशा जीवनाला सार्वकालिक जीवन ( Everlasting life ) म्हणता येईल.

## ध्यान कसे करावे ?

जितेंद्रिय तो बंधु-आत्मा; अजितेंद्रिय तो शत्रु-आत्मा. बंधु आत्म्याने शत्रु-आत्म्याचा उद्धार करावा. नंतर, ईश्वराशिवाय दुसरे काही नाहीच असे पाहण्याचा प्रयत्न करावा. अशा प्रयत्नाने बुद्धी ' आत्मौपम्य ' होते. आत्मौपम्य बुद्धी असलेला ' समदृष्टी ' होतो. समदृष्टी लाभलेला ' अहिंसक ' होतो. आत्मौपम्य बुद्धीने म्हणजेच ' सुखानुकूलता व दुःखप्रतिकूलता ' उमजून वागणारा हिंसक असेलच कसा ? समदृष्टी म्हणजेच विनोबांच्या शब्दात ' शुभदृष्टी '.

ध्यानामध्ये अडथळा येतो मनाच्या चंचलपणाचा. मनाचे चांचल्य कबूल करून व मनाचे दुर्निग्रहत्व कबूल करून त्यावर उपाय सुचविला आहे ' अभ्यास आणि वैराग्य ' हा. विनोबांच्या स्पष्टीकरणानुसार, अभ्यास हे विधायक साधन व वैराग्य हे विध्वंसक साधन होय. पुनःपुन्हा सद्विचारांचे चिंतन म्हणजे अभ्यास. सतत असद्विचारांचा त्याग म्हणजे वैराग्य.

शुभ हेतू मनी धरून क्वचित ध्यानी चलितमानस झाला तरी हरकत नाही. ध्यानयोगापासून असा भ्रष्ट झालेला मनुष्य ' शुचीनां, श्रीमतां ' म्हणजे पवित्र चांगल्या कुळात जन्म घेतो व पुनः आपला ध्यानयोग चालू ठेवतो. आणि अनेक जन्मांच्या नंतर ' योगी ' होतोच.

शुद्ध प्रदेशी बैसोनी करावे आसन स्थिर ।
मृगाजिनांकुशीं वस्त्रीं बसावें नीच उंच ना ।।

बाह्य वातावरण असे असले की ते ध्यानाला योग्य असते.

परिमितता देखील ध्यानाला पोषक असते. इंद्रियांवर ताबा, इंद्रियांवर पहारा आणि इंद्रियांचा योग्य तेवढाच उपयोग असे या परिमिततेचे स्पष्टीकरण आहे. फार ' खाऊ नये, फार उपवासही करू नये; फार झोपू नये व झोपेशिवाय राहू नये. अशा प्रकारे ' नियत परिमाण ' असावे.

## परिशिष्ट

ध्यानयोग कशासाठी ? योगी बनण्यासाठी.

* * *

## अध्याय ७ वा

ज्ञानविज्ञान योग हे नाव अध्यायाला दिले आहे. ज्ञान आणि विज्ञान यातील फरक लक्षात घेतला पाहिजे. तसेच सांख्ययोग नामक अध्यायातील ज्ञानापेक्षा आणखी काही वेगळे ज्ञान या अध्यायात सांगितले आहे काय हेही पाहिले पाहिजे.

शब्द यथार्थत्वाने समजण्यासाठी आचार्यांच्याच जवळ जावे. आचार्य म्हणतात, ' ज्ञान म्हणजे परमेश्वराच्या मत् तत्त्वाचे ज्ञान ' आणि ' विज्ञान म्हणजे शास्त्रीय ज्ञानाचा अनुभव '.

सांख्ययोगाच्या अध्यायात ' ज्ञान सांगितले आहे ' म्हणण्यापेक्षा, तेथे ' कर्मयोगापेक्षा ज्ञानयोग श्रेष्ठ ' असे प्रतिपादन केले आहे. खास ज्ञानाचेच प्रतिपादन तेथे नाही. म्हणून, वेगळेपणाने या अध्यायात ' ज्ञान ' स्पष्ट केले आहे–असे मानावयास हरकत दिसत नाही.

' विज्ञान ' मात्र या अध्यायात कोठे सांगितले आहे, कळत नाही '

' श्रद्धावान् भजते यो माम् ' म्हणजे ' श्रद्धेने जो मला भजतो ' असे वाक्य सहाव्या अध्यायाच्या अखेरच्या श्लोकात आले आहे. ' मी त्यालाच युक्ततम म्हणजे सर्वश्रेष्ठ योगी मानतो ' हा त्या वाक्याचा उत्तरार्ध होय. वाक्याच्या पूर्वार्धातील ' मला ' ह्या शब्दावरील भाष्य म्हणजे हा सातवा अध्याय होय.

### खरा मी

खरा मी पुढीलप्रमाणे आहे, असे भगवान सांगतात—मीच जगाचे कारण आहे. जग त्रिगुणात्मक आहे पण मी त्रिगुणातीत आहे. मी भूत, भविष्य, वर्तमान जाणतो. सर्वांनाच मी लाभत नाही, भक्तालाच मी लाभतो.

### खरा भजक

खरा भजक पुढीलप्रमाणे असावा, असे भगवान सांगतात—

'मयि आसक्त मनाः' म्हणजे वरील प्रकारचा जो मी, त्या माझ्यात ज्याचे मन आसक्त आहे व त्यात जो समाधानी आहे, असा; यत्नशील म्हणजे दृढसंकल्प, व्रती आणि यत्न करीत राहणारा, गुणविकारांनी म्हणजे रागद्वेषांनी मोहित न होणारा; आणि 'ज्ञानी' म्हणजे 'तत्त्व'-ज्ञानी, आर्त, जिज्ञासू व अर्थी हा खरा भजक नव्हे.

### श्रद्धावान म्हणजे ?

श्रद्धेने भजणारे भक्त बहुधा, नेमका खरा 'मी' म्हणजे भगवंत सोडून देतात आणि अन्य देवतांना भजतात. अन्य देवतांना श्रद्धेने भजतात. त्यांच्या ह्या श्रद्धायुक्ततेमुळे त्यांच्या अज्ञानालाच भक्कम आधार लाभतो व देवतांचे काम्य पूजन न करणारा अश्रद्ध ठरतो. त्या देवतांना 'अन्य देवता' संबोधून गीतेने त्यांच्या भक्तांस 'अल्पमेधस्' म्हणजे 'बेअक्कल' च म्हटले आहे. देवतांच्या नादी लागणारांना 'मी' लाभत नाही.

### परिशिष्ट

ज्ञानी भक्ताला मी प्रिय व मला ज्ञानी भक्त प्रिय.

* * *

## अध्याय ८ वा

ध्यानयोग्य जे ब्रह्म, त्या ब्रह्मासंबंधीचा हा 'ब्रह्माक्षरनिर्देश' नामक आठवा अध्याय. हा अध्याय अंमळ अपरिचित वा अलक्षित म्हणावा लागेल. इतर अध्यायांच्या मानाने ह्या अध्यायातून उद्धृत केलेली वचने बरीच कमी दिसतात.

### परिप्रश्न व उत्तरे

सातव्या अध्यायाच्या अखेरीस आलेले 'ब्रह्म, अध्यात्म, कर्म अधिभूत, अधिदैव, अधियज्ञ व प्रयाणकाली ज्ञान' हे शब्द अर्जुनाला नीट न समजल्यामुळे, या अध्यायाच्या सुरुवातीलाच तो विचारतो, 'म्हणजे काय?' (येथे वाटते की अर्जुनाचे निमित्त करून सर्वांसाठीच प्रश्नोत्तरे केली आहेत.)

भगवंतांनी दिलेली उत्तरे अशी आहेत-ब्रह्म अक्षर आहे. ब्रह्माचा आत्मभाव

म्हणजे अध्यात्म, भूते उत्पन्न करणारे द्रव्यपरित्याग लक्षण ते कर्म ( यज्ञ ). अधिभूत म्हणजे प्राणिमात्राला लागू असलेले विनाशित्व. अधिदैव म्हणजे प्राणिमात्राला जे उपकारक ते सूर्य इत्यादी. अधियज्ञ म्हणजे यज्ञाभिमानी विष्णु म्हणजेच देहातील 'मी.' अंतकाली जो भाव असतो, तेथे तो मनुष्य जातो हे निश्चित.

## ब्रह्म

'ब्रह्म कसे आहे? ते अनुशासक आहे. ते कोणाचे अनुशासन करते? क्रान्तिदर्शी सर्वज्ञ अशा कवीचे, आणि जे चिरंतन म्हणजे पुराणे, त्याचेही ब्रह्म अणूपेक्षाही सूक्ष्मतर आहे. विविध प्राणिमात्रांचा विधाता, असे ते आहे. ते अचिंत्यरूप आहे. ब्रह्म म्हणजे नित्यचैतन्यप्रकाश! मोहरूपी अंधकाराच्या पलीकडे असणारे असे ते आहे. ( हे वर्णन वाचून, हे काव्य की तत्त्वज्ञान, असा संभ्रम उत्पन्न होतो. )

## ॐ

ॐ हे अक्षर ब्रह्माचा निर्देश करणारे आहे. ब्रह्म अक्षर आहे व अव्यक्तही आहे. अक्षरत्वाचे व अव्यक्तत्वाचे निर्देशक काहीतरी मानले पाहिजे; ते ॐ हे अक्षर मानावे. हेच अक्षर ब्रह्मसंज्ञक म्हणून वेदवित् लोक मानत आले आहेत.

या ॐ अक्षरामुळे योगीजनांची मोठी सोय झाली आहे. सर्व द्वारे बंद केली, मन आवरून ठेवले, मन हृदयात कोंडून ठेवले, स्वतःचा प्राण मस्तकापर्यंत ( विशिष्ट नाडीतून ) नेऊन ठेवला—थोडक्यात म्हणजे, 'योगधारणा' केली, देहत्यागाचा समय आला; अशा वेळी ब्रह्माचे उच्चारण-स्मरण करायचे, ते कसे? त्यावेळी ॐ ॐ असा उच्चार करीत राहता येते.

## योगप्रक्रिया

वेदज्ञान, यज्ञ, तप, दान इत्यादींच्या फलावर मात करणारे, असे हे योगित्व आहे. योगाची जी शारीरिक प्रक्रिया आहे ती कितपत विश्वासपात्र आहे, कुणास ठाऊक? अर्थात् ही शंका घेताना, श्रीज्ञानेश्वर महाराजांची क्षमा मागणे अपरिहार्यच ठरते. शारीरिक प्रक्रिया व मानसिक प्रक्रिया यांची तुलना करता, शारीरिक प्रक्रिया कनिष्ठच नव्हे तर अविश्वसनीय वाटते.

हटयोगानुसार वीर्यसंग्रह महत्त्वाचा आहे; पण राजयोगानुसार प्रजाजनना-

मागील इच्छाशक्ती ( Will ) चे उन्नयन व उत्तुंगीकरण हेच खरोखर महत्त्वाचे आहे. तंबाखूची उचकी किंवा दारूचा चटका लावून घेण्यापेक्षा मानसिक ब्रह्मचर्याची किमयाच प्रभावी होय. शारीरिक प्रक्रियेपेक्षा, अभ्यास, अनन्यता, भक्ती ही मानसिक प्रक्रिया मात्र सहज समजण्यासारखी आहे.

## अभ्यासयोग

जीवनमरणावर स्वामित्व मिळवावयाचे तर, मरणाचे स्मरण सदैव राखून वागले पाहिजे. अभ्यासयोगावर विनोबांचा रास्त जोर आहे. चांगल्या संस्कारांचा अभ्यास रोज झालाच पाहिजे. ज्या गोष्टीचा अभ्यास रात्रंदिवस चालला आहे, ती गोष्ट चिकटून का नाही राहणार? बाहेरून सतत स्वधर्माचरण व आतून सतत हरिस्मरण होईल, तेव्हा ' मरण ' आनंदाचेच वाटेल. विनोबांचे हे विचार पटले म्हणजे, योग्याच्या प्रयाणकाली योग्य अशा सूर्यचंद्रादिकांचा त्यांनी लावलेला अर्थ सुंदर वाटतो.

## ॐ चे शाब्दिकत्व

ॐ हा एकाक्षरी शब्द आहे. तो दृश्य असा वर्णरूप आहे. उच्चार्य व श्राव्य असा तो ध्वनिरूपही आहे. शब्दाचे महत्त्व संत योहानाने सांगितले आहे–' आरंभी शब्द होता, आणि शब्द देवासह होता, नव्हे नव्हे–शब्द देवच होता. ' गीता म्हणते, ॐ ला अर्थ आहे. ' अक्षरांत मी अकार आहे ' आणि ' वाणीत मी ॐ आहे. ' भगवंताच्या या वचनानुसार ॐ हे ब्रह्माचे विभूतिरूप होय ! ' मी अल्फा ( Alpha ) आणि ओमेगा ( Omega ) आहे, या वचनातूनही ॐ संभवतो ! ॐ हे एक मॉडर्न आर्ट पद्धतीचे चित्र आहे व ते परमेश्वराचे चित्र आहे.

ॐ काराचे हे शब्दत्व व अर्थत्व लक्षात घेतले म्हणजे ' ब्रह्माक्षरनिर्देश ' हे नाव या अध्यायाला समुचितत्वाने शोभून दिसते.

## परिशिष्ट

ब्रह्म हे अचिंत्यरूप आहे.

* * *

# अध्याय ९ वा

' राजविद्या-राजगुह्य ' ह्या भगवंतप्रणीत अध्यायाला विनोबांनी ' राजयोग ' हे दुसरे सुटसुटीत नाव सुचविले आहे.

सातव्या अध्यायाशी ह्या नवव्या अध्यायाचे साम्य ' ज्ञान व विज्ञान ' ह्या विषयांवरून स्पष्टच आहे. पण सातव्यापेक्षा हा नववा अध्याय अधिक लोकप्रिय झाला आहे.

## दयाळू देव

मनुष्य स्खलनशील आहे. त्याला प्रायश्चित्ताखेरीज मोक्ष कुठला ? पण अशा माणसाला, दयाळू देव गुह्य म्हणजे गूज सांगून सोडवू पाहत आहे. विज्ञानासह ज्ञान हेच ते परमगुह्य.

पण अठराव्या अध्यायात देवाचा खरा दयाळूपणा दिसतो. नको प्रायश्चित्त, नको ते ज्ञान; केवळ ' भगवंतापुढे शरणागती ' पुरे आहे. आधी ज्ञान होणेच तर कठीण, विज्ञान त्याहूनही कठीण. शरण जाणे किती सोपे !

## उघडे केलेले गुपित

परमेश्वर अव्यक्त आहे. ' झालेले सर्व ' त्याच्यात आहे पण तो त्या भूतांत नाही. परमेश्वर सर्वांचा स्वामी आहे. प्रकृती हे एक कोडेच आहे. ही प्रकृती परमेश्वराची आहे. प्रकृतीच्या साह्याने परमेश्वर जगाचा कर्ता असतो. पण तो करून अकर्ताही असतो.

परमेश्वर ज्ञेय आहे; पण श्रद्धेय आहे. प्रकृती ज्ञेय आहे म्हणजे अज्ञेयच आहे आणि जग ज्ञेय आहे म्हणजेच नामरूपात्मक आभास आहे.

( ईश्वर करून अकर्ता व जग असून नसलेले. परमेश्वराचे स्वामित्व ' ना निवारी, ना नियमी ' असे बुळे ! प्रापंचिकांना ईश्वर मानवत नाही, याचे कारण हेच आहे. ईश्वर नियामक वा निवारक नसल्यामुळे दुर्जनांना खूपच फावते, आणि सज्जन किंकर्तव्यमूढ बनतात. )

इंद्रियां कवाड देऊनि ', हृदयीं भोगण्यासारखे हे ' राजगुह्य ' ज्याला कळेल ' स वै मुक्तोऽथवा पशुः । '

## मूढांचा परमेश्वर

भूतस्थ नसलेला व महेश्वर असलेला परमेश्वर मूढांच्या हाती सोन्याचांदीचा होऊन बाहुले बनतो. दिसायला ही सगुणभक्ती दिसते खरी, पण विपरीत ज्ञानातून ज्ञान उद्‌भवू शकत नाही.

## गूढ जाणून घेणारा महात्मा

ज्ञान होण्यासाठी माणूस महात्मा म्हणजे अक्षुद्र मनाचा हवा. झोपेतही विरागी, श्रद्धावान, धर्माचरणी, विवेकी, आनंदी, मुक्तीपेक्षाही भक्तीचा प्रेमी, अनन्य आणि सहज नीतिमान–अशा वर्णनाचा माणूस ( मी तर म्हणतो ) ज्ञानी झाला काय अन् न झाला काय, सारखेच! परमेश्वराचे गुण-कीर्तन करणारा, हा महात्म्याचा एक प्रकार.

दुसरा प्रकार विश्वतोमुख परमेश्वराला भजणारांचा. भेदभाव किंवा अज्ञानाची आहुती देऊन महात्मा ज्ञानयज्ञ करतो. पण या यज्ञात कर्मकांड आटलेले असते. कारण सर्व काही एका ' मी 'मध्ये म्हणजे परमेश्वरातच असते.

## भक्तीकडे कल

ज्ञान सांगता सांगता गीता भक्तीकडेच कलू लागते. बाविसाव्या श्लोकापासून ' अनन्याश्चिंतयन्तो माम् ', ' पत्रं पुष्पं फलं तोयम् ', ' यत्करोषि यदश्नासि ' ' स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः' हे सर्व श्लोक सर्वांच्याच तोंडी बसले ते ह्यामुळेच. ' असू दे तू स्त्री असलीस तरी, तू वैश्य अस नाहीतर शूद्र अस, वाइटातला वाईट दुराचरणी असलास तरी हरकत नाही '– ही भाषा काय ' ज्ञानी हो ' म्हणून सांगते ? ' माझा भक्त हो ' असेच सांगते.

## संन्यासयोगयुक्तात्मा

राजगुह्यालाच चिकटून राहावयाचे तर, २८ व्या श्लोकातील संन्यासयोग-युक्तात्मा ' हा शब्द राजगुह्य सांगणारा ठरावा. संन्यास म्हणजे ईश्वरार्पणता. योग म्हणजे कर्मयोग. आत्मा म्हणजे अंतःकरण समजल्यास, अंतःकरणाचा विषय ' भक्ती '. सारांश ज्ञान-कर्म-भक्ती या अर्थाचाच संन्यासयोगयुक्तात्मा हा शब्द होय.

सातवा अध्याय व नववा अध्याय एकाच ' ज्ञानविज्ञानसहितं विषयी असले तरी भगवद्‌गीतेची समन्वयात्मकता नवव्या अध्यायातच डोकावते. भक्तीकडे झुकणारा

हा अध्याय ज्ञानेश्वर महाराजांचा आवडता असणे अगदी साहजिक आहे.

### परिशिष्ट

मनुष्याने संन्यासयोगयुक्तात्मा असावे.

* * *

## अध्याय १० वा

‘ विभूतियोग ’ नावाच्या या अध्यायात, परमेश्वर म्हणतो, ‘ मला ब्रह्मादि देवही जाणत नाहीत, कारण मी त्यांच्याही आधीपासून आहे. ‘ आदिकारण मी सर्वां, आणि मद्योगें जग चालतें हे लक्षात ठेवून व परमार्थतत्त्व जाणून जो मला भजतो तोच मोक्ष पावू शकतो.’

त्यावर अर्जुन विचारतो, ‘ देवा, तूच तुला जाणतोस. ब्रह्मादि देवही तुला जाणत नाहीत, तर मग यावर उपाय काय ? तत्त्व जाणणे तर राहोच, निदान तुझे माहात्म्य तरी जाणणे शक्य आहे काय ?’

तत्त्वतः परमेश्वर जाणणे हा ‘ बुद्धियोग ’ होय. बुद्धियोग सम्यक्दर्शनस्थैर्यलक्षण असा आहे, म्हणजे योग्य दृष्टी आल्याने चांचल्य घालवून स्थैर्य आणणारा आहे. तो साधण्यासाठी उपाय म्हणून हा ‘ विभूतियोग ’ देवाने सांगितला.

### स्थूलाकडून सूक्ष्माकडे

विभूती म्हणजे विस्तार; योग म्हणजे ऐश्वर्य. विस्ताराला अंत नाही; ऐश्वर्य अति तेजस्वी आहे. ईश्वराचा विस्तार व ऐश्वर्य पाहावयास शिकविणारा हा ‘ विभूतियोग ’ होय. प्रथम स्थूल व नंतर सूक्ष्म किंवा From simple to complex; from concrete to abstract म्हणजे सगुणाकडून निर्गुणाकडे, अशा शिक्षणशास्त्रसंमत पद्धतीने, हा अध्याय ‘ तत्त्व ’ समजावून सांगतो.

‘ शशी, सूर्य – तुम्हाला समजतात ना ? तो माझा विस्तार, पण शशीसूर्या-एवढाच मी नाही. शशीचे शशित्व व सूर्याचे सूर्यत्व अशी जी त्यांची, प्रभा, ती मी आहे. तेजस्वितेचे ऐश्वर्य असा जो ‘ रवि ’ तो, म्हणजे त्याचे बीज ( तत्त्व ) जी प्रभा, ती मीच आहे. अशा रीतीने ‘ यच्चापि सर्वभूतानां बीजम् ’ जे जे

म्हणून सर्व भूतांचे बीज, ते मीच. ' असे परमेश्वर सांगतो.

## विभूतियोग व विश्वरूप

विभूतियोगात संक्षेप व अंशता आहे. विश्वरूपात अनेकता व दिव्यता आहे. मर्यादित बुद्धीच्या माणसाला 'संक्षेपाने व अंशतः' सांगितले म्हणजे 'विश्वरूप' ही कळते. या दृष्टीने 'मी कोण आहे' हे सांगण्यासाठी पुढील 'स्थूलांचा' उल्लेख भगवंतांनी केला आहे. 'स्थूल ते सूक्ष्म' जाणण्याचे भान ठेवून वाचावे–

विष्णू, रवी, मरीची, शशी, सामवेद, वासव, मन, चेतना, शंकर, वित्तेश, पावक, मेरू, बृहस्पती, स्कंद, सागर, भृगू, अक्षर, जपयज्ञ, हिमालय, अश्वत्थ, नारद, चित्ररथ, कपिलमुनी, उच्चैःश्रवा, ऐरावत, नराधिप, वज्र, कामधेनू, कंदर्प, वासुकी, अनंत, वरुण, अर्यमा, यम, प्रल्हाद, काल, मृगेंद्र, वैनतेय, पवन, राम, मकर, जान्हवी, सृष्टीचा आदिमध्य-अंत, वाद, अकार, द्वंद्व, धाता, मृत्यू, उद्भव, कीर्ती, श्री, वाणी, स्मृती, मेधा, धृती, क्षमा, बृहत्साम, गायत्री. मार्गशीर्ष, कुसुमाकर, द्यूत, तेज, जय, व्यवसाय, सत्त्व, वासुदेव, धनंजय, व्यास, उशनाकवी, दंड, नीती, मौन व ज्ञान.

वरील उल्लेखितांची स्थूलता सर्वत्र सारखी नाही. पण प्रत्येकाबद्दलचे वैशिष्टय समजावून घेणे मनोरंजक व उद्बोधक होईल. ( त्यासाठी भावेकृत 'नीतिकथा' पाहा.)

## परिशिष्ट

अंशमात्रानेच झालेला हा विभूतिविस्तार पाहून 'पूर्ण मी कसा' ते तत्त्वतः जाणावे.

* * *

# अध्याय ११ वा

'संक्षेपाने व अंशत्वाने' सांगितलेल्या विभूति-दर्शनाने अर्जुन प्रगत झाला, त्याची जिज्ञासा वाढली. म्हणून, 'विस्तार व दिव्यता' घेऊन 'विश्वरूपदर्शन' नावाचा हा अध्याय आला.

## दिव्यचक्षू

ईश्वराचे संपूर्ण ऐश्वर्य पाहण्याची इच्छा अर्जुनाला झाली. ते रूप पाहण्याची कुवत स्वतःच्या ठायी आहे किंवा नाही, हे ठरविण्याचे श्रीकृष्णावर सोपवून त्याने योगेश्वर कृष्णाला विनंती केली, ' दर्शय आत्मानम् अव्ययम् '– तुझे ते अव्यय रूप दाखव.

' प्राकृत चक्षूंनी ते रूप पाहणे शक्य नाही ' असे सांगून योगेश्वराने धनुर्धराला ( ? ) दिव्य चक्षू दिले आणि मग ऐश्वर रूप दाखविले. अनेकता व दिव्यता यांनी ते युक्त होते. ते विश्वरूप होते. ते उग्र दिसले. उग्र दिसले म्हणून भीतिदायक ठरले. पण ' अदृष्टपूर्व ' ते ' दिसले ' म्हणून अर्जुनाला आनंदही झाला.

## निमित्त हो

विश्वात असलेल्या सगळयाच गोष्टींचे एकाच रूपात एकसमयावच्छदाने दर्शन, हे या विश्वरूप दर्शनाचे वैशिष्टय. त्यातील भीतिदायक दर्शन म्हणजे ' कालानिल ', दर्शन होय. लोकांचा क्षय करण्याची दुष्टता, हे सुद्धा परमेश्वराचेच दर्शन होय.

द्रोणास भीष्मास जयद्रथास ।
कर्णास तैसे इतरां अरीस ॥
मी मारिल्या मार, न भीति काही ।
लढोनि शत्रू-विजयीच होई ॥

हा श्रीकृष्णाचा उपदेश ऐकून मात्र विश्वरूपाचीही तात्त्विकता अंमळ कलुषिता झाल्यासारखी वाटते. सर्वांचा संहार करण्यासाठी प्रवृत्त झालेला ' काळ ', फक्त अर्जुनाचाच बचाव करू पाहतो, इतकेच नव्हे तर, त्याला ' संहाराचे निमित्त हो ' असा विचित्र उपदेश करतो. देवाकडून माणसाला असा उपदेश का व्हावा ?

माझ्या ह्या शंकेला हेरूनच की काय, विनोबा म्हणतात, ' दिव्य विश्वरूपाचे श्लोक वाचावे आणि पवित्र व्हावे; तेथे बुद्धी चालवू नये. देवाचे ' हाती निमित्तमात्र म्हणून हत्यार-मुरली म्हणा, खड्ग म्हणा,–खुषीने व्हावे. '

## अर्जनाची स्वस्थता

विश्वरूप पाहून भ्यालेला अर्जुन क्षमायाचना करून, त्या विश्वमूर्तीला ' चतुर्भुज–

किरीटी हो ' म्हणून विनवितो. तदनुसार, देव पुनश्च सौम्यरूप होतो, मानुषरूप होतो. आणि अर्जुन स्वस्थ होतो.

वेद, यज्ञ, अध्ययन, दान, कर्म, तप यांपैकी कशानेही जे विश्वरूप दिसणार नाही, ते अर्जुनाला दाखविण्याचा पक्षपात ( ? ) देवाने का केला ? या प्रश्नाचे उत्तर, ' भक्त्या त्वनन्यया ' म्हणजे ' अर्जुन अनन्य भक्त होता म्हणून. '

तत्वतः परमेश्वराला जाणणे, हेच भक्ताच्या परमेश्वरदर्शनातील रहस्य होय. ' तत्त्वेन ज्ञातुं, द्रष्टुं, प्रवेष्टुं ' या वचनात हेच स्पष्ट आहे. त्यामुळे ह्या अध्यायाला ' भक्तिवैशिष्टययोग ' हे नाव देणे, मला आवडेल. गीता भक्तियोगाकडे झुकत चालली असल्याचा हा आणखी एक पुरावा.

### परिशिष्ट

परमेश्वराचे दिव्य रूप पाहावयास, चक्षू दिव्यच लागतात.

* * *

## अध्याय १२ वा

' भक्तियोग ' नावाच्या या अध्यायातच भक्तिमाहात्म्य सांगितले आहे, असे नाही. अकराव्या अध्यायातील शेवटचे दोन श्लोक अनन्य भक्तीचा व संगवर्जित भक्ताचा उल्लेख करतातच. विश्वरूप व लगोलग सौम्यमानुषरूप, ही दोन्ही रूपे पाहिल्यानंतर अर्जुनाला ' निर्गुण आणि सगुण याविषयी तरतमभाव कसा ठेवावा ' हा प्रश्न पडला. अर्जुन विचारतो, ' देवाचे काम करीत राहणारे व सगुणोपासक भक्त वेगळे आणि अक्षर अव्यक्ताची उपासना करणारे वेगळे; या दोघांपैकी ' योगवित्तम ' कोण ? '

### निर्गुण उपासक

वरील प्रश्नाला गीतेचे निःसंदिग्ध उत्तर, राजगुह्य-राजविद्या सांगताना, ' न तु मां अभिजानन्ति तत्त्वेन, अतः च्यवन्ति ते ' म्हणजे ' न जाणति खरे तत्त्व, म्हणोनि च्युति पावती ', असे आलेलेच आहे. म्हणजेच ' देवव्रतांना ' मार्क नाहीत. सगुणाचे उपासक म्हणजे देवताउपासक, हा अर्थ जरी तंतोतंत बरोबर

नसला तरी अजीबात चुकीचाही होत नसेल तर निर्गुणउपासकोलाच योगवित्तम म्हणावे लागेल.

## सगुण उपासक

पण, पाटीतला माल खपविणाऱ्या फेरीवाल्याप्रमाणे, भक्तियोगाच्या अध्यायात भक्तीचेच मोल सांगणे प्राप्त आहे. देहधाऱ्यांना अव्यक्तासक्त राहणे कठीण आहे, म्हणून; देहधाऱ्यांना कर्मे अटळ आहेत, म्हणून; आणि सगुण सोपे आहे, म्हणून—म्हणूनच सगुणोपासक भक्ताला योगवित्तम म्हणायला हरकत नाही, असा गीतेचा या अध्यायातील अभिप्राय आहे.

## भक्तलक्षणे

एवढेच सांगून हा अध्याय संपता, तर गीताशास्त्र शास्त्र ठरले नसते. त्यात त्रुटी राहिली असती. पण श्लोक १३ ते १९, यांत जी भक्तलक्षणे सांगितली आहेत ती वाचून पाहिली म्हणजे, नाव 'भक्त' पण वाण 'तत्त्ववित्' असे दिसते. हेच या भक्तियोगाच्या अध्यायाचे सौंदर्य!

भक्तांच्या लक्षणांत पहिलेच लक्षण 'सर्वारंभपरित्यागी' हे होय; स्थितप्रज्ञ-लक्षणेच ही!

दुसरे लक्षण, 'अनुद्वेगकरं वाक्यम्.' तर्कशुद्धता, सत्य, निःपक्षपातीपणा असूनही बोलण्यात जर उद्वेगजनकता असेल तर ते अभक्त लक्षणच होईल.

'लोकान्नोद्विजते च यः' या उत्तरार्धाचा अनुवाद विनोबांनी गीताईत, चरणाच्या पूर्वार्धात केला आहे. सहजपणे झाला असेल हा बदल, पण त्यामुळे, 'लोक उद्वेगकारक बोलले तरी' या शर्तीला योग्य महत्त्व आले आहे. लोकांना कंटाळू नये व लोकांनी आपल्याला कंटाळू नये, ही भक्ती सुगम नव्हे!

उद्वेगाचे मूळ 'कर्मे ईश्वरार्पण न करण्यात' आहे. कर्मफलत्याग किंवा सर्वारंभपरित्याग या दोहोंचा अभिप्राय एकच.

सारांश, कर्मफलत्यागी आणि श्रद्धेने युक्त असा सगुण—भक्त योगवित्तमच होय.

सगुण निर्गुण परस्परपूरक आहेत; दोन्ही सोपी आहेत, दोन्ही कठीण आहेत. भक्तीच्या वेलीला ज्ञानाची फुले आली पाहिजेत, हा विनोबांचा भक्तियोगातील मकरंद होय.

### परिशिष्ट

एकाग्र चित्त, अखंड उपासना आणि असीम श्रद्धा यांनी युक्त असेल तोच भक्त व असा भक्तच योगवित्तम म्हणजे श्रेष्ठ योगी होय.

* * *

## अध्याय १३ वा

या अध्यायाचे नाव आहे 'क्षेत्रक्षेत्रज्ञयोग', किंवा 'प्रकृतिपुरुष-विवेकयोग.' देह व आत्मा हेच पृथक्करण वेगळेपणाने, क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ असे आहे. क्षेत्र शरीर व क्षेत्रज्ञ ईश्वर. मी हात आहे, हे हात जाणत नाही म्हणून हात क्षेत्रज्ञ नाही- हा हात आहे, असे जो जाणतो तो क्षेत्रज्ञ- हे उघड आहे.

### क्षेत्र

क्षेत्रात पुढील गोष्टींचा समावेश होतो– पाच कर्मेंद्रिये, पाच ज्ञानेंद्रिये, एक मन, ( इंद्रियविषय ) पाच विषय आणि इच्छा-द्वेष-सुख-दुःख-देहेंद्रियसंघात अंतः-करणातील चेतना व धृती.

### क्षेत्रज्ञ

क्षेत्रज्ञ कसा आहे? क्षेत्रज्ञ पुरुष अनादी आहे. परमेश्वरत्व प्रकृतिद्वयातच आहे. प्रकृतिद्वयही अनादि आहे. परमेश्वराला प्रकृती दोन आहेत परा व अपरा. म्हणून तर संसार उत्पन्न झाला. प्रकृती त्रिगुण आहे पण पुरुष प्रकृतिद्वयासह गुणातीत आहे. क्षेत्रज्ञ म्हणजे आत्मतत्त्व.

### क्षेत्रज्ञ जाणावा

क्षेत्रज्ञाचे ज्ञान हेच खरोखर मनुष्याचे 'ज्ञेय' होय. क्षेत्रज्ञाचे ज्ञान हेच 'मोक्ष-साधन' होय. या ज्ञानाचे लक्षण म्हणून आलेल्या ७ ते ११ श्लोकांचा सारांश सांगणे म्हणजे स्थितप्रज्ञलक्षणांची वा भक्तलक्षणांची पुनरावृत्तीच होईल. तरी पण 'अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम्' म्हणजेच 'अध्यात्मात नित्य दंग, सर्वत्री देव पाहणे', हेच क्षेत्रज्ञाविषयीचे ज्ञान झालेल्याचे लक्षण, पुनः एकदा सांगायला हरकत नाही.

आत्मज्ञानाचे साधन म्हणून ध्यान ( भक्ती ), ज्ञान ( सांख्य ) व कर्म ( योग ) यांचा उल्लेख केला आहे. श्रुतिपरायणता म्हणजे श्रवणभक्ती हा उपाय अजाणांसाठी वेगळेपणाने पंचविसाव्या श्लोकात सांगितला आहे. नेणत्यांनी जाणत्यांकडून ऐकून क्षेत्रज्ञ जाणावा.

### बाहेर पडण्यासाठी आत

श्लोक १९, २० व २१ मोठे मजेदार वाटले. पुरुष प्रकृतीवर अवलंबून नाही पण तो प्रकृतिस्थ होतो, आणि स्वतःची त्रिगुणातीतता विसरतो. प्रकृती पुरुषावलंबी आहे पण तरीहीं ती अनादि आहे. ( शंका येते की जगातील स्त्रीपुरुष पाहूनच तर हे रूपक बनविलेले नाही ना ? )

गुणातीत पुरुष प्रकृतिस्थ झाला की गुणसंग आलाच. आणि मग जन्ममृत्यूचे चक्रही आलेच. ह्या चक्रात सापडल्यानंतर ' मी कोण ? ' हे शोधावे लागते. शोधले म्हणजे सापडते. उत्तर सापडल्यानंतर त्या चक्रातून बाहेर पडणे शक्य होते. बाहेर पडणे हाच आनंद !

चक्रात न पडण्यात मौज नाही; पण पडल्यानंतर त्यातच अडकून पडून राहण्यातही मौज नाही. मौज आहे–आत जाऊन बाहेर येण्यात.

या अध्यायाचा योग्य उपसंहार, विनोबांच्या शब्दांत– देह श्रृंगारू नये, हृदय सुंदर करावे. देह व आत्मा अलग वस्तू आहेत. उपद्रष्टा, अनुमंता, भर्ता, भोक्ता आणि महेश्वर असा उत्तरोत्तर अधिकाधिक अनुभव ' परमात्म्याचा ' घ्या.

### परिशिष्ट

क्षेत्रक्षेत्रज्ञयोग ख्रिस्तजीवनात पाहा. ख्रिस्ताच्या बलिदानात हा अनुभव दिसेल.

* * *

## अध्याय १४ वा

' गुणत्रयविभाग ' नावाचा हा अध्याय म्हणजे क्षेत्रक्षेत्रज्ञयोगाचेच प्रकरण पुढे चालू. सत्त्व, रज व तम या तीन गुणांसंबंधी, ' क्षेत्रक्षेत्रज्ञ ' विषयानुरूप केलेले विवेचन खूपच रेखीव आहे.

क्षेत्र शक्ती व क्षेत्रज्ञ–शक्ती, दोन्ही परमेश्वराच्याच ठायी संभवतात; कशा ? ते विचारू नका. प्रकृती हे क्षेत्र, पुरुष हा क्षेत्रज्ञ. क्षेत्रज्ञ क्षेत्रात बीज टाकतो. क्षेत्रापासून देह उत्पन्न होतात. देहात आत्मा असतो.

## सत्त्व, रज, तम

प्रकृतीपासून उत्पन्न झालेल्या देहात, प्रकृतीचे सत्त्व, रज, तम हे तीन गुण संभवतात. त्रिगुणांचे हे बंधन देहातील आत्म्यालाही स्वीकारावे लागते. बंधनात पडावयाचे व मग त्यातून सुटावयाचे ही मौज १३ व्या अध्यायात आपण पाहिलीच.

सत्त्व–रज-तमासंबंधी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे : तीनही गुण सारखेच बंधनकारक आहेत. सत्त्वगुण सुद्धा मोक्षकारक नाही. बंधनकारकच आहे. म्हणून बंधनातून बाहेर पडावयाचे तर त्रिगुणातीतच झाले पाहिजे.

## निःस्त्रैगुण्य

त्रिगुणातीत व्हायचे; पण कसे ? देह आहे म्हणजे त्रिगुण आहेतच. त्रिगुण प्रवृत्त असले तरी त्यांचा द्वेष करायचा नाही व ते निवृत्त दिसले तरी त्यांची आकांक्षाही करायची नाही–म्हणजे साधली त्रिगुणातीतता. ही फक्त परिणामतःच साधावयाची असते. गुण आहेत, असू देत. त्यांचा परिणाम जो ‘ विचलता ’, तो न होऊ देणे. निंदा-स्तुती, मान-अपमान सारखेच भासू लागणे हेच या निस्त्रैगुण्याचे निश्चित लक्षण होय.

( गुणकर्मविभागशः मानलेल्या चातुर्वर्ण्यात परस्परभेद असणारच. पण त्यामुळे उच्च-नीचता येण्याचे कारण नाही. कारण, तीनही गुण सारखेच बंधनकारक आहेत–हा एक विषयांतरित विचार सहज सुचतो. )

परिणामतः त्रिगुणातीतता साधायची; ठीक आहे. पण कशी ? प्रश्न कठीण आहे, उत्तर सोपे आहे. मात्र प्रश्न व उत्तर दोन्हीही सरळ आहेत.

## अव्यभिचारी भक्तियोग

देह सांडण्याची गरज नाही. किंबहुना ‘ गर्भवासी, सुखे घालावे आम्हासी ’ ही तुकोबांची उक्ती लक्षात घेऊन, बंधनाचे मूळ पाहावे. गर्भवासामुळे बंधन येत नाही. गर्भवासामुळे, देहामुळे ‘ ब्रह्माचा विसर ’ शक्यकोटीत येतो. ब्रह्माचा विसर हेच बंधन होय. ‘ तुझा विसर न व्हावा ’ हेच त्या प्रश्नाचे उत्तर होय. उत्तर मोठे मार्मिक आहे.

गुणत्रय विभागून विनोबा प्रवचन करतात. 'तमोगुण जिंकायचा तर शरीर श्रम (उद्योग) करा. रजोगुण जिंकायचा तर स्वधर्माचरण करा. सत्त्वगुण जिंकण्याचा हमखास उपाय, 'सातत्य व ईश्वरार्पणता' होय.

### परिशिष्ट

सविकल्प ब्रह्माची प्रतिष्ठा 'निर्विकल्प ब्रह्म' होय. अशा 'ब्रह्माचा विसर न पडणे' हेच आत्मज्ञान; हीच गुणातीत अनन्य भक्ती !

* * *

## अध्याय १५ वा

भगवंतांनी या अध्यायाला 'पुरुषोत्तम योग' नाव दिले आहे. क्षेत्रज्ञ व त्रिगुणातीत अशा शब्दांनी वर्णन केलेला परमात्मा, या अध्यायात 'पुरुषोत्तम' म्हणवितो, पुरुषोत्तम म्हणजे पुरुषांत उत्तम. तरभाव दोहोंच्या तुलनेत संभवतो व तमभाव दोनापेक्षा अधिकांच्या तुलनेत संभवतो. उत्तम हा तमभाव होय. तुलना तीन पुरुषांत केली आहे. क्षर पुरुष, अक्षर पुरुष आणि क्षराक्षरातीत पुरुष. जग म्हणजे क्षर पुरुष, जीव म्हणजे अक्षर पुरुष आणि या दोहोंपेक्षा पलीकडचा तो क्षराक्षरातीत पुरुष.

### संसार व ब्रह्म

वृक्ष या रूपकाने हेच सांगितले आहे. वृक्ष म्हणजे संसार किंवा जग. वृक्ष-मूल म्हणजे अव्यक्त ब्रह्म किंवा 'पुरुषोत्तम.' हा वृक्ष रक्षणीय नाही, हा असंग शस्त्राने छेदनीय आहे. ऊर्ध्व असणारे मूळ म्हणजे ब्रह्म–ते तर अच्छेद्यच आहे. ऊर्ध्व हा शब्द संसाररूपी वृक्षाच्या सापेक्षतेने आला आहे. पुरुषोत्तमाच्या बाबतीत 'वर, खाली, मागे, पुढे' ही भाषाच संभवत नाही.

अशा पुरुषोत्तमाला जो अनघ (म्हणजे निष्पाप) व बुद्धिमान जाणतो व भजतो, त्याने जन्माचे सार्थक केले.

गीताशास्त्राचे सारच असा हा पंधरावा अध्याय 'शास्त्ररूप' पावला आहे, असा श्रीशंकराचार्यांचा अभिप्राय आहे. जाणण्याचे महत्त्व दुय्यम करून भजण्याचे

महत्त्व अग्रिम मानून बारावा अध्यायच 'शास्त्ररूप' पावला आहे असे विनोबांचे मत आहे.

### परिशिष्ट

अद्वैतात भक्ती आहे की नाही, याचा वाद घालीत बसून नका; 'देव देऊळ परिवारु। कीजे पोखरुनी डोंगरु। तैसा भक्तीचा वेव्हारु। कां न होआवा?'

* * *

## अध्याय १६ वा

नवव्या अध्यायात 'राजविद्या राजगुह्य' सांगताना दोन प्रकारच्या प्रकृतींचा उल्लेख आला आहे. आसुरी व दैवी (श्लोक १२ व १३). तोच विषय विस्ताराने या अध्यायात असल्यामुळे या अध्यायाला नाव दिले आहे 'दैवासुर-संपद्विभाग योग.'

### दैवी संपत्ती

'देवांचे ऐश्वर्य' हे ज्यांचे लक्ष्य आहे, त्यांना पुढील गोष्टी हव्याशा वाटतात. अभय, अंतःकरणशुद्धी, ज्ञानयोगात निष्ठा, दान (योग्य वितरण), दम, यज्ञ, स्वाध्याय, तप, आर्जव (ऋजुता), अहिंसा (परपीडावर्जन), सत्य, अक्रोध व क्षमा (अक्रोध म्हणजे आलेल्या क्रोधाचे उपशमन), त्याग, शान्ती, अपैशुन (पैशुन म्हणजे दुसऱ्याचे छिद्र प्रगट करणे), लज्जा, अचपलता (विनाकारण लुडबुड न करणे), इंद्रियांची अलोलुपता, तेज, धैर्य, शुचिता, अद्रोह व नीतिमानिता.

ह्या सर्वांना दैवी संपत् म्हणावे, कारण ह्यांच्या आश्रयाने 'राजविद्या' प्राप्त होते.

### आसुरी संपत्ती

'राक्षसी ऐश्वर्य' हे ज्याचे लक्ष्य आहे, त्याला पुढील गोष्टी हव्याशा वाटतात. दंभ, दर्प अभिमान, क्रोध, कठोरवचन, अविवेक-ज्ञान, पुरुषार्थ–साधनांच्या बाबतीत प्रवृत्ति-अभाव, आचार-अभाव, सत्य-अभाव, कामोपभोगपरमता, आत्मसंभावितता, उद्धटपणा व आत्म्याचा द्वेष.

ह्या सर्वांना आसुरी संपत् म्हणावे, कारण, ह्या गोष्टींच्या आश्रयाने, ‘ राज-विद्या ’ दूर हटते.

## अनात्मवादी

बुद्धिवादी, शास्त्रीय दृष्टीचे, विज्ञानवादी, प्रयत्नवादी किंवा थोडक्यात ‘ ऐहिकता-वादी ’ लोक हे आसुरी ऐश्वर्याचे की दैवी ऐश्वर्याचे ? हा प्रश्न पडण्याचे कारण, अशा लोकांचे ठायी काही दैवी तर काही आसुरी गोष्टी दिसतात. अशा लोकांसाठी गीतेचा शब्द आहे ‘ अनात्मवादी ’. पण हे अनात्म-वादी कोणत्या सदरात पडतील ?

आठव्या श्लोकात म्हटले आहे– ‘ जग असत्य आहे म्हणजे अनृतप्राय आहे, धर्म-अधर्म यावर जगाची प्रतिष्ठा मुळीच अवलंबून नाही, जगाचे शासन करणारा ईश्वर-बीश्वर कोणी नाही, कामप्रयुक्त स्त्री-पुरुषांच्या परस्परसंयोगातूनच या जगाची ( लोकांची ) उत्पत्ती आहे, जगाचे मूल कारण ‘ काम ’ आहे– असे हे अनात्मवादी मानतात. ’

विज्ञानयुगातील दोन महायुद्धे लक्षात घेतल्यास, असे दिसते की हिरोशिमावर बॉम्ब टाकणारे हे अल्पबुद्धी लोक उग्रकर्मीच असतात. त्यांना ‘ आसुरी ’ हेच नाव योग्य ठरेल.

## शास्त्र-प्रामाण्य

आसुरीसंपत् बंधनकारक म्हणून ती टाळण्यासाठी, व दैवीसंपत् मोक्षकारक म्हणून ती जवळ करण्यासाठी ‘ शास्त्र-प्रामाण्य ’ हा एक सोपा उपाय आहे. ‘ प्रयोग करून संतांना जे सिद्धान्त लाभले, त्याचेच शास्त्र झाले ’ म्हणून सर्व-साधारण लोकांनी कार्याकार्यांच्या व्यवस्थेसाठी शास्त्राला प्रमाण मानणे इष्ट– असा एक उपसिद्धान्त मांडून हा अध्याय संपविला आहे.

( एखादी यादी करताना अग्रस्थानी आपण कशाचा उल्लेख करतो ? पहिल्यांदा आठवेल त्याचा, किंवा जे महत्त्वाचे त्याचा. ‘ महत्त्व ’ या दृष्टीने दैवीसंपत्तीच्या यादीत ‘ ज्ञानयोगव्यवस्थिती ’ आणि आसुरी संपत्तीच्या यादीत ‘ आत्मद्वेषजन्य कामोपभोगपरमता ’ यांना पहिले स्थान द्यावे, असे मला वाटले.)

“ मोक्ष हे ध्येय; त्यासाठी श्रद्धायुक्त भक्ती हे साधन; कर्म आणि ज्ञान ही केव्हाही प्रशंसनीयच ” अशा साच्यात गीतेचा अध्याय बहुधा संपत असतो. पण

या अध्यायात ' शास्त्रप्रामाण्या 'वर शेवट केला आहे.

### परिशिष्ट

दैवासुरसंपत् असा विभाग करून विधान करते तेच शास्त्र !

* * *

## अध्याय १७ वा

गुणत्रयविभाग सांगताना सांगितले आहे की सत्त्वगुणापासून ज्ञान, रजोगुणापासून लोभ व तमोगुणापासून अज्ञान उत्पन्न होते ( अ. १४ : १७ ) तीनही गुण बंधनकारकच आहेत, म्हणून त्रिगुणातीत होण्याची ही आवश्यकता सांगितली.

सतराव्या अध्यायात, तेच तीन गुण श्रद्धेला कसे त्रिप्रकारक करतात, हे सांगितले आहे; म्हणून या अध्यायाला ' श्रद्धात्रयविभागयोग ' म्हटले आहे.

### शास्त्रप्रामाण्य नसलेली श्रद्धा

दैवी संपत् मिळण्यासाठी शास्त्रप्रामाण्य हवे, असे सांगितले खरे ( अ. १६ ). पण शास्त्रविधी ठाऊक नसणारेच पुष्कळ, त्यांच्याजवळ ' आस्तिक्यबुद्धी ' तेवढी असते. मनुष्य श्रद्धामय असतो, हाच त्याचा अर्थ. मनुष्य जे काय करतो, ते श्रद्धेनेच करतो. सर्वसाधारणतः, श्रद्धेने केलेले ते चांगलेच, असा समज आहे; पण तसे नाही. श्रद्धेने केलेल्या कृत्यांत धर्मशास्त्रादिकांचा उघड उघड उच्छेद नसतो, म्हणून श्रद्धा ' धार्मिक ' वाटते. पण श्रद्धा त्रिगुणापासून सुटलेली नाही. गुणत्रयानुसार श्रद्धेत तारतम्य ठेवणे प्राप्त आहे.

### पूर्वजन्म व वर्तमान संस्कार

श्रद्धा स्वभावज असते. स्वभावज म्हणजे ? स्वभावातून उत्पन्न होणारी आणि स्वभाव म्हणजे ? स्वतःचा भाव. हा गतजन्मातून मिळवलेला असतो, व धर्मादिसंस्कारांनी युक्त झालेला असतो. मरणकाळी तो प्रकट होत असतो. पूर्वजन्माचा प्रभाव हे एक स्वभावाला घडविणारे अदृष्ट कारण होय; चालू जन्मात ते कारण हातचे नसते म्हणून स्वाधीन नसते. चालू जन्मात ' वर्तमान संस्कारच ' महत्त्वाचे.

श्रद्धा त्रिप्रकारक आहे म्हणजे श्रद्धेचे जन्मस्थान जे 'स्वभाव', तो स्वभावही त्रिप्रकारक असतो. तो सात्त्विकच असेल असे नाही. पण म्हणूनच, निदान वर्तमान–संस्कारांना तरी 'सात्त्विक' राखले पाहिजे. तरच त्यापासून सुख संभवेल, ज्ञान संभवेल. राजस व तामस श्रद्धा उच्छेदकच ठरतात; त्या त्याज्यच. दंभ, अहंकार, काम आणि राग यांच्या बलाने युक्त असलेल्या श्रद्धा काय कामाच्या ?

## सात्त्विक श्रद्धा

श्रद्धा सात्त्विकच असावी. श्रद्धेला सात्त्विकता लाभावी, यासाठी 'ॐ तत् सत्' चा उच्चार करून 'यज्ञ, ज्ञान वा तप' करावे.

ॐ तत् सत् या तीन शब्दांनीच 'ब्रह्मनिर्देश' होतो. ब्रह्मस्मरणपूर्वक केलेले जे जे, ते ते सर्व (यज्ञ, दान वा तप) विगुण असले तरी गुणी बनते, स-सत्त्वगुण बनते. फलाची आकांक्षा नसणे, हे सात्त्विक श्रद्धेचे लक्षण होय.

ब्रह्मस्मरणपूर्वक, सात्त्विक श्रद्धेने वागणारा मनुष्य शास्त्रप्रामाण्यात बसतोच. शास्त्रज्ञानाच्या अभावी व केवळ श्रद्धेच्या बळावर वागणाऱ्यालाही शास्त्रप्रामाण्य साधतेच.

## परिशिष्ट

स्वावलंबी पुण्यवान होणे मला नको; परमेश्वरावलंबी पापी असणेच मला प्रिय आहे— हे विनोबांचे म्हणणे 'आस्तिक्य बुद्धीवर' म्हणजेच 'श्रद्धेवर' भरपूर प्रकाश टाकते.

* * *

# अध्याय १८ वा

'मोक्षसंन्यास' नावाचा, गीताग्रंथाचा उपसंहार करणारा एकाध्यायी गीताच असा अत्यंत महत्त्वाचा हा अठरावा अध्याय !

धर्मसंमूढता घालविण्यासाठी गीता सांगितली. फलित काय झाले ? अर्जुनाचा मोह गेला. आत्मतत्त्वविषयक स्मृती त्याला लाभली.

उपसंहार करताना गीतेने पुनः एकदा कर्मयोग आणि सांख्ययोग मांडून दाखविले आहेत.

## कर्मासंबंधी

कर्मासंबंधीचा सांगोपांग विचार या अध्यायात आहे. कोणतेही कर्म कायेने, वाचेने वा मनाने केले जाते. यांपैकी कोणत्याही कर्माला पाच कारणे असतात. अधिष्ठान, कर्ता, करण, चेष्टा आणि दैव ही ती पाच कारणे.

अधिष्ठान म्हणजे देह. कर्ता म्हणजे जीव. करण म्हणजे इंद्रिये. चेष्टा म्हणजे वायूची क्रियाशक्ती-बोलणे, ऐकणे इत्यादी. आणि दैव म्हणजे नशीब नव्हे. दैव म्हणजे त्या त्या इंद्रियामागील देवता.

कर्माची कारणे पाच तसेच हेतूही पाचच. कारणे आणि हेतू यांच्या सीमारेषा सूक्ष्म असल्या तरी स्पष्ट आहेत. एखादे कर्म न्याय्य आहे की अन्याय्य आहे हे ठरविताना त्या कार्याचे कारण पाहिले जात नाही, हेतू पहिला जातो.

कर्माचे प्रवर्तक तीन—ज्ञान, ज्ञेय व परिज्ञाता. ज्ञान म्हणजे ऐंद्रिय ज्ञान, आत्मज्ञान नव्हे. ज्ञाता म्हणजे देहबद्ध जीव, नित्यमुक्त असलेला आत्मा नव्हे. शब्द, रूप, रस, गंध व स्पर्श हे पंचविध ज्ञेय. चंद्र हे ज्ञेय, त्याचे ज्ञान व्हावे म्हणून ज्ञाता रॉकेट सज्ज करतो, अवकाश-यात्रा करतो–अशा रीतीने ह्या कर्माचे प्रवर्तक कोण, ह्या प्रश्नाचे उत्तर ज्ञान-ज्ञेय-परिज्ञाता ही त्रिपुटी.

मग ज्ञाता होतो कर्ता, ज्ञान होते साधन, व ज्ञेय होते कार्य. अशा रीतीने कर्माचा संग्रह होतो कर्ता-करण-कार्यात. ‘आत्मा’ कोणत्याच कर्माचा कर्ता नसतो; हा झाला कर्म विचार.

## कर्मांचे प्रकार

गुणत्रयविभागानुसार, गुणाधिष्ठित कर्माचे तीन प्रकार संभवतात. सात्त्विक कर्म– नियत, संगरहित, द्वंद्वातीत आणि फलाशारहित असे. राजस कर्म– सकाम, अहंकारयुक्त व अतिकष्टयुक्त असे. तामस कर्म–हिंसाकारक, क्षयकारक व मोहाने आरंभिलेले.

सत्त्व, रज व तम हे तीन गुण लक्षात घेऊनच स्वभावज कर्मे शास्त्रांनीही विहित केली आहेत. ब्रह्मकर्म, क्षात्रकर्म, वैश्यकर्म व शूद्रकर्म हे चार प्रकार अशारीतीने, स्वभावज कर्मे व शास्त्रविहित चार वर्णिकांची कर्मे यांत विरोध

नाही, असे श्री शंकराचार्यांचे म्हणणे.

## कर्मे आणि कर्मयोग

देहधाऱ्याला कर्मे अटळ आहेत, हे वरील विवेचनावरून लक्षात येईलच. कर्मत्याग शक्यच नाही. त्याग शक्य आहे तो कर्मांचा नव्हे, केवळ फलाचा. फलत्याग युक्त कर्म हाच कर्मयोग.

नियत कर्म, पावन करणारे असते; त्याचा त्याग करण्यामागे 'अज्ञान' 'कायाक्लेशभय' हे हेतू असतील तर तो त्याग तामस वा राजस ठरेल. म्हणून कार्याचा संग व कार्याचे फल सोडणे हाच त्याग सात्त्विक होय. कर्म करावेच. आणि अखेरीचे सांगणे हेच की राग-द्वेषांपलीकडे जाण्यानेच खरा कर्मत्याग साधेल. अकुशल ( काम्य ) आहे म्हणून त्या कर्मांविषयी द्वेष, आणि कुशल ( मोक्षकारण ) आहे म्हणून त्या कर्मांबद्दल राग म्हणजे प्रेम, ही दोन्ही न ठेवता कर्म करणे हाच खरा कर्मयोग.

४५ ते ४८ या श्लोकचतुष्टयात चातुर्वर्ण्य ही 'व्यवस्था' असल्याचे गीतेने पटवून सांगितले आहे. चातुर्वर्ण्यानुसार आपापल्या कर्मांत तत्पर असावे हीच कर्मयोगाची लौकिक बाजू होय.

## चातुर्वर्ण्य–व्यवस्था

त्रिगुणानुसार सर्वत्र तीन जाती आहेत. ज्ञान, कर्ता, बुद्धी, धृती, सुख इतकेच नव्हे तर प्राणीमात्रही त्रिप्रकारक म्हणजे सत्त्वगुणी, रजोगुणी व तमोगुणी आहेत. पण मनुष्याचे मात्र चार प्रकार व तेही त्रिगुणानुसारच होतात—

( १ ) संपूर्ण सत्त्वगुणानुसार, 'ब्राह्मण'.

( २ ) सत्त्वाकडे झुकणारा पण रजोगुण-प्रधान तो क्षत्रिय.

( ३ ) तमोगुणाकडे झुकणारा पण रजोगुण-प्रधान तो वैश्य. आणि

( ४ ) रजाकडे झुकणारा पण तमोगुण-प्रधान तो शूद्र.

वरील चार वर्णांच्या मनुष्यांच्या स्वभावज कर्मांची यादी पुढीलप्रमाणे, गीता देते.

ब्राह्मणांची कर्मे–शम, दम, तप, शौच, आर्जव, ज्ञान, विज्ञान व आस्तिक्य.

क्षत्रियांची कर्मे–शौर्य, तेज, धृती, दक्षता, युद्धात अपलायन, दान, ईश्वरभाव ( हाताखालच्या लोकांवर प्रभुशक्ती प्रकट करणे ).

वैश्यांची कर्मे–कृषी, गौरक्ष्य, वाणिज्य.

शूद्रांची कर्मे–परिचर्या इत्यादी.

## स्वकर्मानुष्ठानानेच सिद्धी

चातुर्वर्ण्य ही अव्यवस्था नाही, व्यवस्था आहे असे मानल्यास, स्ववर्णानुसार स्वकर्मानुष्ठानानेच अशुद्धता जाते व सिद्धी मिळते, हे समजणे कठीण नाही.

त्रिगुणात्मकतेमुळे सर्वच कर्मे सदोष असतात. म्हणूनच सह-ज कर्म हेच अनुष्ठेय ठरते.

स्वभाव-ज कर्म हाच स्व-धर्म, म्हणून तेच कर्म श्रेष्ठ व त्यात विगुणता असली तरी पाप नाही.

शिवाय, ईश्वराची पूजा कर्माने करावयाची असते. पूजार्थ कर्म ' ज्ञान ' प्राप्त करून देते. व त्या ज्ञानानंतरच सिद्धी येते.

' समाजसुधारणा ' म्हणून चातुर्वर्ण्य व्यवस्था मोडून ' समानता ' आणणे गीतेला संमत नाही. मात्र चातुर्वर्ण्य ही स्थिती ओलांडून जायचे असेल तर मार्ग आहे. ' आत्मज्ञ ' होणे हाच तो मार्ग.

## ज्ञान आणि सांख्ययोग

कर्माच्या कारणाशी, हेतूशी, प्रवर्तकत्वाशी अथवा संग्रहाशी ज्याचा सुतराम संबंध नाही असा जो आत्मा, त्याचे ज्ञान म्हणजेच ' आत्मज्ञ होणे ' हा आहे सांख्ययोगाचा विषय. ४९ व्या श्लोकापासून ५५ व्या श्लोकापर्यंत या अध्यायात पुनः एकदा सांख्ययोग सांगितलेला आहे.

संन्यासाने ( म्हणजे सम्यक् दर्शनाने किंवा तत्पूर्वक सर्व कर्मांच्या त्यागाने ) नैष्कार्यसिद्धी ( म्हणजे निष्क्रिय होणारास व आत्मरूपी स्थिर होणारास लाभणारी सिद्धी ) प्राप्त होते. नैष्कार्यसिद्धी कर्मजसिद्धीपेक्षा वेगळी असते. आत्मज्ञ, असक्तबुद्धी व ज्ञाननिष्ठ कर्मे करतो पण तो चातुर्वर्ण्यापलीकडे गेलेला असतो. अशा ब्रह्मनिष्ठाला ' ब्रह्म ' प्राप्त होते. ज्ञाननिष्ठ अशा या कर्मयोग्याची आत्मदृष्टी देहमात्र नसते; ती आत्मरूप म्हणजे निर्गुण निराकार असते.

ज्ञान व ज्ञाननिष्ठा ही दोन वेगळी आहेत. ज्ञान ( म्हणजे ब्रह्मज्ञान ) होण्यासाठी यत्न लागत नाहीत. कारण, ब्रह्म सर्वांत प्रसिद्ध, ठळक आहे.

अविद्येने आरोपिलेल्या नामरूपादिकांचे निराकरण केले की ज्ञान प्रकट झालेच. पण ज्ञान होऊनही ज्ञान निष्ठा येणे शिल्लक राहतेच. सांख्य योग म्हणजे नुसते ज्ञान होणे नव्हे; ज्ञाननिष्ठा हा खरा सांख्ययोग होय. ज्ञाननिष्ठा ही एक भक्तीच होय.

## भक्तियोग

स्वभावज व स्वधर्म अशी कर्मे करणारा कट्टर चातुर्वर्ण्यधर्मी सोडला व ज्ञाननिष्ठा गाठून नैष्कर्म्यसिद्धी देणाऱ्या कर्मांचा कर्ता, असा मनुष्यही वगळला; तर ? सर्वसामान्य मनुष्य सर्वच कर्मे करतो–सर्वच म्हणजे प्रतिषिद्ध कर्मे सुद्धा, परंतु ईश्वर मानून, ईश्वरार्पणबुद्धीने तो ती करतो. ‘ अधर्मकर्मे ’ न कळत घडली असता जे पाप होईल ते करणारा, असा हा सर्वसामान्य माणूस सुद्धा ‘ भक्त ’ असू शकतो. देव म्हणतो, ‘ त्या पापांपासून मी त्या भक्ताला सोडवीन; शोक करण्याचे काही कारण नाही, जमेल त्याने ज्ञाननिष्ठ जरूर व्हावे; त्यापेक्षा सोपा मार्ग आहे कर्मनिष्ठांचा; पण सर्वांत ‘ सोपा ’ आणि सर्वांच्या आटोक्यातला म्हणून ‘ सरळ ’ मार्ग आहे भक्तिनिष्ठांचा.

भगवद्गीतेतील, भक्तियोगाची पुनरावृत्ती करणारे ५६ ते ६६ हे श्लोक, नुसतीच पुनरावृत्ती करीत नाहीत. ज्ञान आणि कर्म बाजूला सारण्याचे नवेच काम ह्या श्लोकांद्वारे गीता करीत आहे, असे वाटते.

भक्तियोग ! परमेश्वरशरणता म्हणजे भक्तियोग. अनन्यपणाने, एका परमेश्वराला ‘ माझा आश्रय ’ म्हणून स्वीकारणाऱ्या सामान्य (!) मनुष्याला ईश्वरप्रसादाने ब्रह्मप्राप्ती होते. हा विश्वास आचार्य श्रीशंकरांनाही आहे.

तर मग, गीताशास्त्रानुसार निःश्रेयस साधन ज्ञान की कर्म ? या प्रश्नाचे उत्तर ‘ भक्ती ’ हेच द्यावे लागेल.

उपसंहारात्मक म्हणून भगवान श्रीकृष्ण अर्जुनाशी जे काही बोलले, त्या बोलण्यातील प्रत्येक वाक्य पाहा–‘ तमेव शरणं गच्छ ’ म्हणजे ‘ ईश्वरालाच शरण जा. ‘ यथेच्छसि तथा कुरु ’ म्हणजे ‘ तुला जसे वाटेल तसे कर. ’ ( कृतीचे हे स्वातंत्र्य केवळ भक्तीतच असू शकते. ) ‘ इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ’ म्हणजे ‘ तू माझा अत्यंत आवडता आहेस म्हणून तुझ्या हिताचे ते सांगतो. ’ ‘ मद्भक्तः भव ’ म्हणजे ‘ माझा भक्त हो. ’ ‘ सर्वधर्मान्परित्यज्य

मामेकं शरणं व्रज '–' सर्वप्रकारची कर्मे सोडून देऊन माझा आश्रय घे '; ' मा शुचः ' म्हणजे ' शोक करू नकोस. '

आणि अखेरीस अर्जुनही पाहा कसे भक्तासारखेच सांगतो – ' हे अच्युता, तू प्रसन्न झालास म्हणूनच माझा मोह गेला, म्हणूनच मी निःसंदेह झालो. ( तू जरी म्हणतोस ' यथेच्छसि तथा कुरु ' तरी ) तुझ्या म्हणण्याप्रमाणेच मी आता वागणार. माझी म्हणून इच्छा नाहीच मुळी. ( Thy will be done ), तुझ्याच इच्छेप्रमाणे सर्व काही होवो.'

## योगेश्वर व धनुर्धर

संजयाने प्रस्तुत केलेले हे श्रीकृष्णार्जुनांचे संभाषण, संजयाच्याच शब्दात विराम पावते. अखेरच्या श्लोकात श्रीकृष्णाला ' योगेश्वर ' म्हटले आहे. श्रीकृष्ण सदाचाच योगेश्वर होता, आहे व असेल. अर्जुनाने मात्र उचललेले धनुष्य खाली ठेवले होते, ते त्याने पुनः हाती धरले म्हणून अर्जुनाला ' धनुर्धर ' म्हणण्यात एकप्रकारे भगवद्गीतेची फलश्रुतीच दिसते.

अर्जुनाचे ' धनुष्य घेणे ' — धनुर्धारित्व वाच्यार्थाने घेता येणार नाही. अर्जुनाचे धनुष्य म्हणजे ' इच्छास्वातंत्र्यपूर्वक योगेश्वर कृष्णाच्या इच्छेनुसार वागण्याची तयारी ' होय !

## परिशिष्ट

सर्वसंगपरित्यागें शरणागत हो मला ।
एकट्या; सर्व पापें मी जाळीन; त्यजि शोक तूं ॥

* * *

## अर्जुनाने विचारलेले प्रश्न

अध्याय १. ( १ ) मला कोणाविरुद्ध लढावयाचे आहे ?
( २ ) आपण सुखी कसे होऊ ?

अध्याय २. ( ३ ) पूजायोग्य अशा भीष्मादिकांवर मी बाण कसे सोडू ?
( ४ ) श्रेय कोणते ?
( ५ ) स्थितप्रज्ञाची लक्षणे कोणती ?

अध्याय ३. ( ६ ) कर्मापेक्षा बुद्धी ( ज्ञान ) श्रेष्ठ आहे, असे मानल्यावर, हे श्रीकृष्णा, मला तू भयंकर कर्मांत कां गुंतवितोस ?

( ७ ) स्वतःची इच्छा पाप करण्याची नसताना मनुष्य पाप करतो; त्याला पाप करावयास कोण लावतो ?

अध्याय ४. ( ८ ) ह्या जन्माखेरीज तुला इतरही जन्म होते, ( हे श्रीकृष्णा ), हे मी कशावरून समजू ?

अध्याय ५. ( ९ ) संन्यास आणि कर्मयोग यांपैकी एक कोणते श्रेय आहे ? ( ते मला निश्चित सांग. )

अध्याय ६. (१०) ब्रह्म म्हणजे काय ? अध्यात्म म्हणजे काय ? कर्म म्हणजे काय ? अधिभूत म्हणजे काय ? अधिदैव म्हणजे काय ? या देहात अधियज्ञ कोण आणि कसा ? अंतकाळी तुला कसे जाणावे ?

अध्याय १०. (११) भगवंता, तुझ्या विभूती कोठे व कशा ओळखू ?

अध्याय ११. (१२) उग्ररूप असणारा तू कोण आहेस ?

(१३) तुझे ईश्वरी रूप कोणते ?

(१४) तुझे अव्यय रूप कोणते ?

अध्याय १२. (१५) अक्षर अव्यक्ताची उपासना करणारे भक्त आणि विश्वरूपाची उपासना करणारे भक्त या दोहोत ‘ थोर योगी ’ कोण ?

अध्याय १७. (१६) शास्त्रविधी न पाळता पण श्रद्धेने जे लोक देवाला पूजितात, त्यांच्या निष्ठेला काय म्हणावे–सात्त्विक, राजस की तामस ?

अध्याय १८. (१७) संन्यासातील तत्त्व काय व त्यामागील तत्त्व काय ?

टीप : अध्यायवार दिलेल्या वरील प्रश्नांची नेमकी उत्तरे गीतेतूनच शोधून काढण्याचा प्रयत्न करणारांना गीता आत्मनेपदी होईल.

## भगवान श्रीकृष्णाचे आत्मचरित्र

मी पूर्वी होतो, आज आहे व पुढेही असेन. स्वर्गात असो, पाताळात असो वा मृत्युलोकात असो, मला ‘ कर्तव्य ’ असे काही नाही; कारण ‘ कर्तव्य ’ करून

काही ' मिळवावयाचे ' असे मला काही नाही. तरी पण, मी श्रेष्ठ असल्यामुळे, माझे अनुकरण करणारे पुष्कळ लोक असतात म्हणून मी ' शास्त्रविहित ' कर्मे करीतच असतो. मला वर्णसंकर आवडत नाही. उगीचच कुणाला ' रहस्य ' सांगणे मला पसंत नाही; पण मित्राला रहस्य सांगणे मला आवडते.

मी अज आहे, अव्यय आहे आणि मी ईश्वर आहे; तरी पण मी जन्म घेतो. माझ्या जन्म घेण्यामागे, ' साधूंचे रक्षण, दुष्टांचा नाश व धर्माची संस्थापना ' हा हेतू असतो. माझा जन्म दिव्य व माझे कर्मही दिव्य; सामान्य नव्हे. माझ्या जन्मासाठी ' आईबापाची गरज ' नाही. मी स्वतः होऊन, स्वतःला जन्म देऊ शकतो ! असे माझे पुष्कळ जन्म झाले व ते सर्व मला आठवतात.

' जशास तसे ' हे तत्त्व मी पाळतो. मी लोकांना मार्गदर्शन करतो. गुणकर्म-विभागानुसार मनुष्यांचे चार वर्ण मी मानतो. मीच या चातुर्वर्ण्याचा जनक आहे. पण त्याचा संहार करावयाचा झाल्यास, संहारकही मीच आहे.

मी स्वार्थी नाही, दयाळू व प्रेमी आहे; जो मला सर्वत्र पाहतो, त्याचा मी असतो. मी ' अज्ञेय ' नाही, पण जाणून घ्यायला स्वस्तही नाही. मन दुर्निग्रह असले तरी जो मनुष्य, अभ्यास व वैराग्य यांच्या साह्याने मनास जिंकतो, तोच मला जाणू शकेल. अनन्य भक्तांसाठी मी सुलभ आहे.

अक्षर व अव्यक्त ' तत्त्व ' हे माझे परमधाम होय. मी ' व्हा ' म्हटले, की नुसत्या माझ्या संकल्पाने भुते होतात. प्रकृतीचा आश्रय केला की, मी सृजनशील होतो. माझी सृष्टी प्रकृति-अधीन असते. या उत्पत्ति-प्रकरणात, माझे कर्तृत्व केवळ अध्यक्षीय असते.

मी मनुष्यदेह धारण करतो पण मी मनुष्य नसतोच. मी भक्तांचा प्रपंच व परमार्थ, दोन्ही चालवितो. मी समभावाने वागतो, म्हणजेच सदाचारी भक्ताला व दुराचरण सोडून सदाचरणी बनलेल्या भक्ताला-दोघांनाही सारखेच मानतो. कुळावरून ' उच्चनीच ' असा भेद मी करीत नाही.

माझे रूप ' अमुक ' म्हणून सांगता येणार नाही. माझी रूपे विविध आहेत. माझे रूप पाहण्यासाठी ' दिव्य ' दृष्टीची आवश्यकता असते. माझ्या ' विश्वरूपात ' सौम्यता आहे तशीच उग्रताही आहे, सृजन आहे आणि संहारही आहे.

मला संमत असलेली भक्ती म्हणजे ज्ञानच होय. ' स्थिरमती ' हे विशेषण ज्याला लागू शकेल, त्यालाच मी ' भक्त ' मानतो.

तेजोमय, आद्य, अनंत, श्रेष्ठ, क्षेत्रज्ञ, क्षेत्रातीत, उपद्रष्टा, अनुमंता, भर्ता, भोक्ता, महेश्वर, परमात्मा ही माझीच विशेषणे होत.

मनुष्य-शरीरातील ' जीवात्मा ' हा माझाच अंश होय. या जीवात्म्यामुळेच इंद्रियांना चेतनत्व लाभते.

अनन्य भावाने शरण येणाऱ्याला, सर्व पापांपासून मुक्त करण्यास मी समर्थ आहे.

* * *

REFBK-0021643